सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - ९४ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ शनिवार दि. ३ मे २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६


## पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताचा मोठा निर्णय

## पाकिस्तानमधून होणाऱ्या सर्व आयातीवर घातली बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नवी दिल्ली**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला, तर या घटनेत अनेक पर्यटक गंभीर जखमी झाले होते. या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्यासह सिंधू पाणी करार स्थगित करण्यात आला होता. तसेच पाकिस्तानी विमानांसाठी भारताने आपलं हवाई क्षेत्र बंद करण्याचाही निर्णय घेतला.

यानंतर आता भारताने पाकिस्तानच्या विरोधात आणखी एक मोठं पाऊल उचललं आहे. भारताने पाकिस्तानमधून होणाऱ्या सर्व आयातीवर बंदी घालण्यात आली आहे. राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक धोरणाच्या हितासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती भारत सरकारने दिली आहे.



पाकिस्तानमधून भारतात निर्यात होणाऱ्या सर्व वस्तूंवर आता भारतात बंदी घालण्यात आली आहे. दरम्यान, भारताच्या या निर्णयाचा फटका पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवर होण्याची शक्यता आहे. या बंदीच्या निर्णयाअंतर्गत पाकिस्तानमधून येणाऱ्या कोणत्याही उत्पादनाच्या आयातीवर पूर्णपणे बंदी असणार आहे. एवढंच नाही तर पाकिस्तानमधून एखादी वस्तू आयात होणारी असो किंवा अप्रत्यक्षपणे दुसऱ्या कोणत्याही देशातून पाकिस्तानी वस्तू भारतात आयात होणार असेल तर त्यावरही बंदी असणार आहे.

दरम्यान, वाणिज्य मंत्रालयाने या संदर्भातील अधिसूचना जारी केली आहे. या अधिसूचनेत म्हटलं आहे की, पाकिस्तानमधून भारतात होणाऱ्या सर्व वस्तूंची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आयात किंवा वाहतूक, मग ती मुक्तपणे आयात करता येण्याजोगी असो किंवा नसो, पुढील आदेशापर्यंत प्रतिबंधित असेल. राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक धोरणाच्या हितासाठी हे निर्बंध लादण्यात आले आहेत. या निर्बंधातील कोणत्याही अपवादासाठी भारत सरकारची पूर्व परवानगी आवश्यक असेल, असं अधिसूचनेत म्हटलं आहे.

## जिसकी जितनी हिस्सेदारी उसकी उतनी भागीदारी..

### काँग्रेसची बॅनरबाजी भाजपच्या जिव्हारी : अमरावती शहरात काँग्रेस ची जोरदार बॅनरबाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

जातनिहाय जनगणनेची केंद्र सरकाने घोषणा केल्यानंतर, या अत्यंत महत्त्वाच्या निर्णयाचे श्रेय, भाजप घेण्यास सुरुवात केली आहे. याला प्रत्युत्तर देण्यासाठी काँग्रेसने देखील रणनीती आखली आहे.



काँग्रेसच्या कार्यकारी समितीची बैठक दिल्लीत झाली असून, हा मुद्दा हातून निसटू नये, यासाठी जातगणनेच्या इतर संवेदनशील मुद्यांवरून केंद्राची कोंडी करण्याची तयारी केली आहे. केंद्राने जातनिहाय जनगणनेची घोषणा करताच, काँग्रेस देखील आक्रमक होत श्रेयवादाच्या लढाईत उतरली आहे. अमरावतीमध्ये काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर आणि खासदार बळवंत वानखडे यांनी जोरदार बॅनरबाजी करत भाजपला डिवचलं आहे.

केंद्रातील मोदी सरकारने नुकतीच जातनिहाय जनगणना होणार असल्यास जाहीर केलं. काँग्रेस (उेपसीर्शी) नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेता राहुल गांधी यांनी जातनिहाय जनगणनेची मागणी सातत्याने लावून धरली होती. जातगणनेला कडाडून विरोध करणाऱ्या भाजपला अखेर नमते घ्यावे लागले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना १६ एप्रिल २०२५ मध्ये पत्र लिहून हिच मागणी करण्यात आली होती. त्यावेळी देखील जातगणनेला विरोध करण्यात आला. पण आता केंद्रातील मोदी सरकारने जातगणनेचा निर्णय झाला. या सर्वांचे श्रेय काँग्रेसने कार्यकारी समितीच्या बैठकीत राहुल गांधी यांना दिले. राहुल गांधी या मागणीवर आता केंद्र सरकार काम करत असल्याने त्याचे श्रेय घेण्याची तयारी संपूर्ण देशात काँग्रेसने सुरू केली आहे. भाजपकडून देखील या निर्णयाचे स्वागत होत आहे.

अमरावती शहरात काँग्रेस पक्षाच्या नेत्या माजी मंत्री यशोमती ठाकूर व काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे यांनी संपूर्ण अमरावती शहरात जोरदार बॅनरबाजी केली, आता जातीय जनगणना होणार, असा उल्लेख यामध्ये करत, बहुजन की जीत है, राहुलजी का संघर्ष है, असे म्हणत भाजपला डिवचलं आहे. जिसकी जितनी हिस्सेदारी उसकी उतनी भागीदारी, असा उल्लेख बॅनरबाजीत करण्यात आला आहे.

काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर आणि खासदार बळवंत वानखडेयांनी प्रतिक्रिया देताना, राहुल गांधी यांच्या संघर्षाला यश आलं, त्यांनी सातत्याने जातीय जनगणनेची मागणी केली होती. त्यामुळे आता त्याची तातडीने अंबलबजावणी व्हावी, अशी मागणी केली.

## '...तर, खाते बंद केले तरी चालेल'

### लाडकी बहीण योजनेसाठी निधी वळवल्यानं मंत्री संजय शिरसाटांचा संताप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

राज्यातील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा एप्रिल महिन्याचा १५०० रूपयांचा हप्ता जमा होण्यास सुरूवात झाली. मात्र, या योजनेसाठी निधी मिळवताना चांगलीच दमछाक होत असल्याचं समोर आलं. लाडकी बहीण योजनेचा एप्रिल महिन्याचा हप्ता देण्यासाठी सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास खात्याचा निधी वळवण्यात आला. दोन्ही विभागांचे ४१० कोटी ३० लाख आणि ३३५ कोटी ७० लाख रूपये मिळून महिला आणि बालविकास विभागाच्या खात्यात वळवण्यात आला. या निर्णयानंतर सामाजिक आणि आदिवासी विकास खात्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी संताप व्यक्त केला.



निधी वळवल्याच्या मुद्द्यावर संजय शिरसाट म्हणाले, 'खरंतर तुमच्या माध्यमातून या संदर्भातील माहिती मिळाली, जवळपास सव्वाचारशे कोटी वर्ग करण्यात आले, याची कल्पना नव्हती. जर सामाजिक खात्याची आवश्यकता नसेल तर, खाते बंद केले तरी चालेल', असं म्हणत मंत्री संजय शिरसाट यांनी संताप व्यक्त केला.


'मला खरंतर याची काहीच कल्पना नव्हती, यासंदर्भात मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करेन. फायनान्स डिपार्टमेंटची मनमानी चालू आहे. आपण जे काही म्हणू तेच खरं असं सुरू आहे. माझ्या खात्याचा निधी इतर ठिकाणी परस्पर वर्ग करता येत नाही, हा खरंतर नियम आहे. माझं मागच्या वर्षीचं दायित्व १५०० कोटी रूपयांचे आहे. माझं देणे वाढत आहे', असं शिरसाट म्हणाले.'माझ्या खात्याचा कोणताही निधी वर्ग करता येत नाही,हा कायदा आहे. फायनान्स येथे काही हुशार लोक बसले आहेत. त्यांना असे वाटत की निधी वळवता येते. कायद्यात पळवापळवी करून निधी घेणे चुकीचे आहे, असं रोष व्यक्त करत शिरसाटांनी निधी वळवणे चुकीचं असल्याचं म्हटलं आहे.

'हे पैसे दलीत भगिनींना दिले असे म्हणता येत नाही. फायनान्समध्ये बसलेले शकुनी लोक आहेत, असं म्हणत शिरसाट यांनी संताप व्यक्त केला.

## पाकिस्तानने केली अब्दाली क्षेपणास्त्राची चाचणी, मारा क्षमता ४५० किमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३लाहोर**

पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला. भारत-पाकिस्तान युद्धाची शक्यता वर्तवली जात असताना पाकिस्तानने अब्दाली क्षेपणास्त्राची चाचणी केल्याचा दावा केलाय. पाकिस्तानने शनिवारी या क्षेपणास्त्राची चाचणी घेतली. या क्षेपणास्त्राची मारा क्षमता ४५० किलोमीटर असल्याचे सांगितले जातंय.



भारताकडून होणाऱ्या संभाव्य हल्लयामुळे पाकिस्तान घाबरलाय आणि आता शक्तीप्रदर्शन करत भारताला चेतावणी देत आहे. पाकिस्तानचे म्हणणे आहे की पाकने जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या अब्दाली या क्षेपणास्त्राची चाचणी केली आहे. ही चाचणी पाकिस्तानच्या लष्करी सराव खछअ़गड चा एक भाग होती. पाकिस्तानच्या सोनमियानी रेंजमध्ये ही चाचणी करण्यात आली. या चाचणी दरम्यान पाकिस्तानी सैन्याचे स्ट्रेटेजिक फोर्स कमांडचे कमांडर लेफ्टनंट जनरल मुहम्मद शाहबाज खान आणि स्ट्रेटेजिक प्लांस डिवीजनचे डीजी मेजर जनरल शहरयार परवेज बट उपस्थित होते.दरम्यान, अब्दाली क्षेपणास्त्राला हत्फ-२ असेही म्हणतात. हे क्षेपणास्त्र पाकिस्तान अंतराळ संशोधन केंद्र आणि संरक्षण विज्ञान आणि तंत्रज्ञान संघटना यांनी संयुक्तपणे विकसित केले आहे. हे एकल-स्टेज, घन-इंधनयुक्त मोबाइल बॅलिस्टिक क्षेपणास्त्र असल्याचा दावा केला जातो. या मिसाइलची रेंज ४५० किलोमीटर आहे. याशिवाय, हे क्षेपणास्त्र पेलोडसह ५०० किलोमीटर उडू शकते. या क्षेपणास्त्रात अण्वस्त्रे वाहून नेण्याची क्षमता नाही. परंतु हे क्षेपणास्त्र पारंपारिक स्फोटकांनी मोक्याच्या ठिकाणांना, लष्करी तळांना आणि शहरांना लक्ष्य करू शकते.

## बोगस जन्म दाखल्या प्रकरणी ना . तहसीलदारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी डॉ किरीट सोमय्या अचलपूर पोलीस ठाण्यात

### दोशी प्रशासकीय अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई होणार : किरीट सोमय्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अचलपूर**

भाजप चे नेते डॉ किरीट सोमय्या यांनी आज अचलपुर पोलीस स्टेशन ला भेट देत तत्कालीन अचलपुर येथील नायब तहसीलदार यांना अधिकार नसताना स्वतः न्यायाधीश बनत बांगलादेशी नां ३२४ जन्म दाखले दिले त्या अधिकाऱ्यावर येत्या ७ दिवसात फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी अचलपुर पोलीस स्टेशन ला प्रत्यक्ष भेट देऊन केली आहे . प्राप्त माहितीनुसार अचलपुर तहसील कार्यालयामार्फत ३२४ बोगस जन्म दाखले दिल्या गेल्याचे प्रकरण मार्च महिन्यात डॉ . किरीट सोमय्या यांनी



उघडीस आणले होते त्याचे सर्व दस्तावेज तहसीलदार अचलपूर व जिल्हाधिकारी अमरावती यांना दिले होते तरी देखील अजून पर्यंत ते दाखले परत मागितले नाही व त्या नायब तहसीलदारावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही प्रशासनाने केली नाही त्यामुळे आज अचलपूर पोलीस स्टेशन मध्ये प्रत्यक्ष भेट त्या संबंधित नायब तहसीलदारावर सात दिवसाच्या आत फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी मागणी अचलपुर पोलीस स्टेशन यांनी केली आहे . यानंतर भाजप पक्षाचे जेष्ठ नेते व माजी खासदार डॉक्टर किरीट सोमय्या यांनी अचलपूर तहसील कार्यालय येथे उप विभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांच्याशी या प्रकरणासंदर्भात सविस्तर चर्चा केली . तहसील कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधताना सोमय्या यांनी सांगितले की आज २ मे रोजी अचलपूर पोलीस स्टेशन येथे २ तक्रारी दिल्या आहे . त्यामध्ये एक अचलपूर तहसील कार्यालयातील एका नायब तहसीलदारांनी स्वतः तोतया न्यायाधीश होत त्यांना कोणतेही अधिकार नसताना ३२४ जन्माचे दाखले दिले तसेच दूसरे म्हणजे अचलपुर तहसील कार्यालय येथे अनेक नाबोगस जन्म दाखल्या प्रकरणी ना . तहसीलदारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी ची मागणी त्यांनी अचलपूर पोलीस स्टेशन येथे उपविभागीय पोलीस अधिकारी संतोश खांडेकर यांच्या कडे केल्याची माहिती त्यांनी पत्रकारांना दिली .

## अजित पवार- शिंदे मुख्यमंत्री होणार नाहीत : संजय राऊत कडाडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

अजित पवार मुख्यमंत्री होतील हा योग कधी येईल? असा प्रश्न उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्री पदाबाबत आशा व्यक्त केली होती. यावरुन राऊत यांनी त्यांच्यावर निशाणा साधला.

या संबंधीत प्रसार माध्यमांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, मी नेहमी म्हणतो की, छगन भुजबळ जर शिवसेनेमध्ये आणखी काळी राहिले असते तर मुख्यमंत्री झाले असते. नारायण राणे अजून काही काळ शिवसेनेत राहिले असते तर ते शिवसेनेतून पुन्हा मुख्यमंत्री झाले असते. मनोहर जोशी झाले ना! ते पक्षाबरोबर निष्ठेने राहिले त्यामुळे मुख्यमंत्री झाले. मात्र, एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होणार नाहीत आणि अजित पवार देखील जोपर्यंत भारतीय जनता पक्षासोबत आहेत तोपर्यंत मुख्यमंत्री होणार नाहीत. जर हे दोन्ही पक्ष भाजपमध्ये विलीन झाले तर ते कदाचित भारतीय जनता पक्षाचे मुख्यमंत्री होतील. हे त्यांना अमित शहा यांनी देखील सांगितले आहे. हे आधीच मी दैनिक सामनामध्ये लिहिले देखील असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा गट जर भाजपमध्ये विलीन झाला. तर सिद्धरमय्या यासारखे ते भाजपचे एक मुख्यमंत्री होऊ शकता. तसे झाले तरच एकनाथ शिंदे किंवा अजित पवार हे मुख्यमंत्री होऊ शकतात, हे मी आधीच सांगितलं आहे, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.


## अजितदादांची पर्यटन महोत्सवाच्या उद्घाटनाला दांडी

### उद्याचा दौराही कन्फर्म नाही, राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३सातारा**

महाबळेश्वरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय महापर्यटन महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमाला शुक्रवारी (२ मे) उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दांडी मारली. त्यांच्या पक्षाचे स्थानिक आमदार तथा मदत, पुनर्वसन मंत्री मकरंद पाटलही कार्यक्रमाकडं फिरकले नाहीत. त्यामुळं राष्ट्रवादीनं महोत्सवाकडंच पाठ फिरवल्याची चर्चा आहे.

महोत्सवाच्या नियोजनात राष्ट्रवादीला डावललं? : महाराष्ट्राचं 'मिनी काश्मीर' अर्थात महाबळेश्वर हा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा तालुका. महाबळेश्वरपासून काही किलोमीटर अंतरावर त्यांचं दरे गाव आहे. त्यामुळं महापर्यटन महोत्सवाच्या नियोजनात शिंदे गटाचाच वरचष्मा दिसून आला. पालकमंत्री तथा पर्यटन मंत्री शंभूराज देसाई हे महोत्सवाच्या नियोजनात आघाडीवर होते. महाबळेश्वर तालुका हा वाई



मतदारसंघात असताना स्थानिक आमदार, मंत्री मकरंद पाटील यांना नियोजनात कुठेही स्थान नव्हतं. त्यामुळं राष्ट्रवादीला डावललं गेल्याची भावना अजित पवारांच्या पक्षात दिसून येत आहे.

**अजितदादांचा रविवारचा दौराही कन्फर्म नाही**

अजित पवार हे शुक्रवारी दुपारी कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगडमध्ये होते. त्यांचा कार्यक्रम दुपारी संपला. त्यामुळं सायंकाळी होणाऱ्या महाबळेश्वर पर्यटन महोत्सवाच्या उद्घाटनाला ते हजर राहतील, असं वाटत होतं. मात्र, त्यांनी दांडी मारली. महोत्सवाचा समारोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत रविवारी (४ मे) होणार आहे. मात्र, अजित पवार यांचा रविवारचा महाबळेश्वर दौराही कन्फर्म नसल्याची माहिती समोर येत आहे.

**एकनाथ शिंदे तीन दिवस दरे गावी मुक्कामी**

पर्यटन महोत्सवाच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शुक्रपासून महाबळेश्वर तालुक्यातील आपल्या दरे गावी मुक्कामी आहेत. महोत्सवाच्या उद्घाटनानंतर हेलिकॉप्टरने त्यांनी दरे गाव गाठलं. रविवारी समारोपापर्यंत ते महाबळेश्वर दौऱ्यावर आहेत. त्यामुळं तीन दिवस त्यांचा मुक्काम दरे गावात आहे.

# संपादकीय ......

## ‘जातनिहाय जनगणना’ ऐतिहासिक निर्णय

दीड वर्षापूर्वी बिहार सरकारने विधिमंडळात ठराव करून जातनिहाय सर्वेक्षण केले. त्यानुसार राज्यात ओबीसींची संख्या ६३ टक्के असल्याचे दिसून आले. बिहारमधील ओबीसींची संख्या राष्ट्रीय सरासरीपेक्षाही अधिक असल्याचे त्यातून स्पष्ट झाल्याने विरोधकांच्या जातनिहाय जनगणनेच्या मागणीला बळ मिळाले. देशात दर १० वर्षांनी जनगणना होते. पण १९३१ नंतर जातनिहाय जनगणना झालेली नाही.

काँग्रेसप्रणीत यूपीए सरकारने २०११ मध्ये जनगणनेसोबतच सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण केले होते. मात्र त्याचाही तपशील अद्याप उपलब्ध झालेला नाही. हा तपशील जाहीर करण्यासोबत २०२१ची प्रलंबित जनगणना जातनिहाय करावी, अशी मागणी पुढे आली होती. सध्या पहलगाम हल्ल्याला सडेतोड प्रत्युत्तर देण्याची व्यूहरचना आखली जात असतानाच केंद्र सरकारने आकस्मिकरीत्या जातनिहाय जनगणना करण्याची घोषणा करून, सर्वांनाच धक्का दिला. आगामी बिहार विधानसभा निवडणूक तोंडावर आली असताना, जातगणनेस मान्यता दिल्यामुळे बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दल (राजद) व काँग्रेसपुढे नवे आव्हान तयार झाले आहे.मुख्यमंत्री नितीशकुमार आणि राजदचे नेते लालूप्रसाद यादव हे जेव्हा एकत्र होते, त्याचवेळी त्यांनी जातनिहाय सर्वेक्षण केले होते आणि देशव्यापी जातगणनेची मागणीही केली होती. आजवर जनगणना करताना केवळ अनुसूचित जाती व जमातींची मोजणी केली जात असे. पण देशाच्या एकूण लोकसंख्येत ओबीसी, अतिमागास व उच्चवर्णीय जातींचे प्रमाण मोजले जात नसे. मात्र या जनगणनेमुळे उपेक्षित, मागास घटकांना समाजाच्या आणि त्यायोगे विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्याची दारे उघडली जातील. सामाजिक समतोल साधल्याशिवाय प्रगतीचे अंतिम लक्ष्य साध्य होत नसते. त्यादिशेने पाडलेले हे आशादायक पाऊल मानता येईल. घटनेच्या अनुच्छेद २४६च्या केंदीय सूचीतील अनुक्रमांक ६९ मध्ये जनगणनेचा स्पष्ट उल्लेख आहे. हा केंद्राचा विषय असला, तरी काही राज्यांनी जातींची गणना करण्यासाठी सर्वेक्षण केले. पण त्यात पारदर्शीपणा नव्हता.कर्नाटकात १० वर्षांपूर्वी झालेल्या जातींच्या सर्वेक्षण अहवालास तेथील काँग्रेस सरकारने पुन्हा ऐरणीवर आणले असले, तरी वोक्कलिग व लिंगायत या प्रभावी समाजांनी या अहवालास विरोध केला आहे. तेलंगणातील काँग्रेस सरकारने सर्वेक्षण सुरू केले असून, आंध्र- प्रदेशात तत्कालीन जगनमोहन रेड्डी सरकारने सर्वेक्षणास मंजुरी दिली होती. पण मुख्यतः राजकीय उद्देशाने प्रेरित होऊनच ही सर्वेक्षणे झाली. लोकसभेची २०२४ मधील निवडणूक तसेच हरियाणा व महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी जातनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली होती. मात्र विरोधकांच्या काँग्रेसप्रणीत इंडिया आघाडीची ही मागणी म्हणजे केवळ राजकीय नौटंकी असल्याचा आरोप भाजपने आहे होता.काँग्रेसने नेहमी जातगणनेला विरोध केला असल्याचा दावाही केला गेला. स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळातील वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद यांसारख्या नेत्यांनी तसेच खुद्द पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी जातनिहाय जनगणना न करण्याचा निर्णय घेतला होता. कारण त्यामुळे समाज विभागला जाईल, अशी भीती त्यांना वाटत होती. त्यावेळी नुकतेच स्वातंत्र्य मिळालेले असल्यामुळे एकजुटीने राष्ट्रउभारणी करण्याचे आव्हान समोर होते. मात्र आज भारत ही जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनलेली आहे. माहिती क्रांती आणि जागतिकीकरण यामुळे लोकांचे एकूण राजकीय-सामाजिक भान वाढलेले आहे. तरीही अद्याप समाजाचे अनेक प्रश्न आहेत.

जनगणनेमुळे समाजात कोणत्या जातीचे किती लोक आहेत, याची सविस्तर माहिती मिळेल. त्यामुळे प्रसंगी आरक्षणाची फेररचना आणि मांडणी करावी लागणार आहे. आरक्षण मर्यादा वाढवण्यावरही विचार करावा लागणार आहे. अनेक जातींना अजूनही आरक्षणाचा लाभ मिळत नाही, त्यांना तो देता येईल. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसने काही वर्षे गेल्यावरही जातनिहाय जनगणना घेण्याचे टाळले. २०१० मध्ये तत्कालीन कायदा मंत्री वीरप्पा मोईली यांनी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना पत्र लिहून, जातनिहाय जनगणनेची मागणी केली. त्यावेळी पंतप्रधानांच्या कार्यालयाने मोईली यांचे हे सूचनावजा पत्र जनगणना आयुक्तांकडे पाठवले.आयुक्तांनी ही मागणी फेटाळून लावली. त्यानंतर पुन्हा राजद, समाजवादी पार्टी, द्रमुक, जदयू या पक्षांनी तसेच भाजपमधील ओबीसी खासदारांनी अशीच मागणी केली. तेव्हा तत्कालीन गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी या प्रक्रियेतील व्यावहारिक अडचणींचा पाढा वाचला. मात्र हे वास्तव असले, तरीही राहुल गांधी यांनी २०१३ पासून ते आजपर्यंत जातनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली होती. कोणत्याही पक्षाच्या भूमिका बदलत असतात. काँग्रेसचाही पवित्रा तसाच बदलला. तसे पाहू गेले, तर रा. स्व. संघानेही जनगणनेचा राजकारणासाठी गैरवापर व्हायला नको, अशी भूमिका मांडली आहे. अशा जनगणनेची मागणी करून जाती-जातींमध्ये भेद निर्माण करणारे विभाजनवादी राजकारण काँग्रेस करत असल्याचा आरोप भाजपने केला होता.

आता ही जनगणना कधी सुरू करणार, याचे वेळापत्रक जाहीर करावे, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली असून, आम्ही ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा हटवण्यासाठी भाजपवर दबाव टाकणार आहोत, असे त्यांनी म्हटले आहे. या निर्णयाचे काँग्रेसपासून ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षापर्यंत सर्वांनीच स्वागत केले आहे, हे महत्त्वाचे. काही परंपरावादी मंडळी जातगणनेमुळे जातिभेद वाढतील, अशी जी भीती व्यक्त करतात, त्याला काहीच अर्थ नाही. भारतातील जातवास्तव नाकारण्याचा उद्योग व्यवस्थेचे सर्व फायदे लाटणारेच करू शकतात! जातनिहाय जनगणना झाल्यावर, विकासप्रक्रियेत मागे राहिलेल्या वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण, रोजगार, आरोग्य, कौशल्य प्रशिक्षण वगैरे आघाड्यांवर काय काय करता येईल व कोणत्या प्रमाणात ‘औषधा’ची मात्रा द्यावी लागेल, याचा नक्की अंदाज येऊ शकेल. शोषित-वंचितांपैकी काही मोजक्याच जातींचे लोक सर्व फायदे लाटत आहेत की नाहीत, हेही कळेल. ही जनगणना आता शास्त्रशुद्ध पद्धतीने व प्रामाणिकपणे व्हावी, एवढीच अपेक्षा.

## बुधवारातील आझाद हिंद मंडळाच्या शिबिरामध्ये १०० दात्यांचे रक्तदान



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

स्थानिक आझाद हिंद मंडळ बुधवारा अमरावतीच्या वतीने मंडळाचे दिवंगत सदस्य, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख सोमेश्वर पुसतकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १ मे रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात १०० जणांनी रक्तदान केले.

शिबिराचे उद्घाटन स्व. सोमेश्वर पुसतकर यांच्या प्रतिमेचे पूजन मंडळाचे कार्याध्यक्ष माजी महापौर विलास इंगोले, नीळकंठ मंडळाचे माजी अध्यक्ष बाबासाहेब गंगात्रे, मंडळाचे सदस्य ज्ञानेश्वर हिवसे, राजेश जायदे, सुशील कथलकर यांच्या हस्ते झाले. त्यानंतर रक्तदान कार्यक्रमाला सुरवात झाली. या प्रसंगी माजी स्थायी समिती सभापती विवेक कलोती, अविनाश दुधे, दिलीप कलोती, ड. आशिष लांडे. नंदू गुबले. नितीन सराफ, प्रवीण पाटील, संजय मुचळंबे, भूषण पुसतकर, पंकज लुंगीकर, नीलेश कारंजकर, डॉ.संजय शिरभाते, जयंत कलोती, प्रा. डॉ संजय तीरथकर, पुसतकर कॉलेजचे प्राचार्य विजय दरणे, डॉ. गोविंद तिरमनवार, डॉ. पंकज मोरे, डॉ. पी. आर. जाधव, सचिव श्रीकृष्ण बाळापुरे तसेच रक्तदान समितीचे महेंद्र भुतडा, अजय दातेराव, संदीप खेडकर, प्रा. संजय कुलकर्णी, उमेश पाटणकर, राकेश ठाकूर, प्रा.राजेश पांडे, सीमेश श्रॉफ, श्याम शर्मा, वंदना चौधरी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी मंडळाचे कार्याध्यक्ष विलास इंगोले यांच्या मार्गदर्शनात मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## वरुड बसस्थाकावरून प्रवाशाची पर्स चोरी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३ वरुड-** बसस्थाकातून बसमध्ये प्रवास करण्यासाठी आलेल्या पश्चिम बंगाल येथील स्मिती अरूण किरतोनिया (४२) ह. मु. शेंदूरजनाघाट या गुरुवार १ मे रोजी कलकत्ता आण्यासाठी नागपूर बसमध्ये दुपारी दीड वाजताच्या सुमारास चढल्या; परंतु बसमध्ये चढत असताना चोरट्याने गर्दीचा फायदा घेवून त्यांच्याजवळील पर्स उडवली. ज्यामध्ये २० हजार रुपये नगदी व ४० हजार किमतीचे ८ ग्रॅम सोन्याचे कानातील आभूषण असा एकूण ६२ हजार रूपयांचामुद्देमाल होता.

ही बाब बस इंदिरा चौकात पोहचल्यानंतर त्यांच्या लक्षात आली; परंतु त्यांनी काटौल बसस्थाकावरून परतून याप्रकरणी वरूड पोलिसांत तक्रार दाखल केली.




## सावधान! प्रोसेस्ड फूड्स ठरतायत हृदयरोगाचं मुख्य कारण

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक**

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमध्ये हृदयविकाराच्या घटना झपाट्याने वाढत आहेत. अगदी चालताना, व्यायाम करताना, नाचताना लोक हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू पावत आहेत. यामागील मुख्य कारण म्हणजे चुकीचा आहार आणि चुकीच्या सवयी.

आजारांना निमंत्रण देणारे सर्वात मोठे माध्यम म्हणजे आपल्या रोजच्या आहारातील काही ‘गुप्त शत्रू’. ट्रान्स फॅट, सॅच्युरेटेड फॅट, अधिक मीठ आणि साखर असलेले अन्नपदार्थ हे हृदयासाठी अत्यंत धोकादायक ठरतात. प्रोसेस्ड, डीप फ्राईड आणि जंक फूड्सचा अधिक वापर केल्यास हृदयविकाराचा धोका वाढतो. काहीजण जिममध्ये शरीर बनवण्यासाठी प्रोटीन सप्लिमेंट घेतात, तेही हृदयविकाराचे मोठे कारण बनू शकतात. त्यामुळे या सर्व गोष्टींना दूर ठेवणे आवश्यक आहे.

ही ५ अन्नपदार्थं हृदयासाठी अत्यंत हानिकारक आहेत:

कुकीज, पेस्ट्रीज, फ्रोझन स्नॅक्स:

यामध्ये भरपूर प्रमाणात ट्रान्स फॅट असते. हे फॅट शरीरात ‘बॅड कोलेस्टेरॉल’ वाढवते आणि धमन्यांमध्ये अडथळा निर्माण करू शकते

प्रोसेस्ड मीट (सॉसेज, बेकन):

ह्या पदार्थांमध्ये सोडियम, सॅच्युरेटेड फॅट आणि नायट्रेट्स असते. हे घटक रक्तदाब वाढवतात आणि धमन्यांची लवचिकता कमी करतात.



डीप फ्राय अन्नपदार्थ (समोसे, भजी, फ्रेंच फ्राईज, ब्रेड पकोडे):

गरम तेलात तळल्यामुळे हे पदार्थ ट्रान्स फॅटने भरलेले असतात, जे हृदयाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करतात.

अधिक मिठाचे पदार्थ (लोणची, पापड, चिप्स, इंस्टंट नूडल्स):

ह्या अन्नपदार्थांमध्ये अत्यधिक सोडियम असतो, जो रक्तदाब वाढवून स्ट्रोक व हृदयविकाराचा धोका वाढवतो.

अत्यधिक साखरेचे पदार्थ (कोल्ड ड्रिंक्स, पॅकेज्ड ज्यूस, मिठाई):

यामुळे ट्रायग्लिसराइड्स वाढतात, मधुमेहाचा धोका निर्माण होतो आणि हृदयावर ताण येतो.

## निंबोळी अर्कासाठी कशी कराल निंबोळ्याची वाळवण व साठवणूक; वाचा सविस्तर

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक**

खरीप हंगामातील तसेच इतर पिकांवरील किडींचे व्यवस्थापन करण्यासाठी निंबोळी अर्काचा वापर अतिशय फायदेशीर आहे.

सध्याच्या परिस्थितीमध्ये कडूनिंबाच्या झाडाला निंबोळ्या लागलेल्या असून त्या पावसाळा सुरू होण्यापूर्वी जमा करून व्यवस्थितपणे साठवणूक करावी. जेणेकरून आवश्यकतेनुसार पिकांवरील किडींच्या व्यवस्थापनासाठी निंबोळी अर्काचा वापर करता येईल. यामुळे खर्चात बचत होऊन पर्यावरणाचे संतूलन राखण्यास मदत होते.

**फायद्याचा कडूनिंब-** महाराष्ट्रात कडूनिंब सर्वत्र आढळतात. या वृक्षाचा प्रत्येक भाग अतिशय उपयोगी आहे. अशा प्रकारचे बहुउपयोगी वृक्ष असल्यामुळे कृषि क्षेत्रात या झाडाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

महागड्या रासायनिक किटकनाशकांचे अनेक दुष्परिणाम जगासमोर येत आहेत. अशा रासायनिक किटकनाशकांमुळे होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी जैविक किटकनाशकांचा उदा. निंबोळी अर्काचा उपयोग करणे गरजेचे आहे.

त्याशिवाय कीड व्यवस्थापनात आवश्यक मित्र किटकांचा या रासायनिक किटकनाशकामुळे नाश होतो. यामुळे हानिकारक किडींपासून पिकांचे नैसर्गिकपणे संरक्षण होत नाही.

**निंबोळ्या गोळा करण्याची पद्धत-** कडूनिंबाच्या झाडाला सामान्यतः वर्षातून एकदाच फळधारणा होते.

झाडाच्या फांद्या हलविल्या की निंबोळ्या जमिनीवर गळून पडतात आणि गोळा करता येतात.

झाडाखाली पिकलेल्या पिवळ्या निंबोळ्याचा सडा पडलेला असतो. त्या गोळा करता येतात.

काडी कचरा काढून टाका.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

गोळा केलेल्या निंबोळ्या व्यवस्थित जमा कराव्यात.

**निंबोळ्या वाळविण्याची पद्धत**

निंबोळ्या उन्हात कोरड्या जागेवर चांगल्या वाळेपर्यंत पसरून ठेवाव्यात.

निंबोळ्याचा थर शक्य तेवढा पातळ ठेवावा.

वाळविण्याची प्रक्रिया काळजीपूर्वक करावी. कारण व्यवस्थितपणे न वाळलेल्या निंबोळ्यांना बुरशी लागू शकते.

पावसाळ्यामध्ये निंबोळ्या बाहेर वळविल्या जात असल्यास पाऊस पडण्यापूर्वी त्या गोळा करून घरात आणून ठेवाव्यात.

**निंबोळ्या साठवून ठेवण्याची पद्धत**

अयोग्य प्रकारे साठवून ठेवलेल्या निंबोळ्याला बुरशी लागु शकते.

निंबोळ्या पोत्यात किंवा टोपल्यामध्ये भरून हवेशीर जागेवर साठवून ठेवाव्या. हवाबंद प्लास्टिक पिशव्या किंवा डब्यामध्ये निंबोळ्या साठविणे अयोग्य आहे.




शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने
देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

## अमरावती सह विदर्भातील काही जिल्ह्यांत वादळी वाऱ्यांसह अवकाळी पावसाची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती-** राज्यातील बहुतांशी शहरांच्या कमाल तापमानात वाढ झाल्यामुळे चटके बसत असतानाच आता पुढील सात दिवस राज्यात काही ठिकाणी अवकाळी पावसाची शक्यता हवामान अभ्यासकांनी वर्तविली आहे.संपूर्ण कोकण, खान्देश, नाशिक,



अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, धाराशिव, बीड, नांदेड, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, अमरावती या जिल्ह्यांत ३ ते १० मेपर्यंतच्या आठवड्यात ढगाळ वातावरण राहील.किरकोळ ठिकाणी एखाद-दुसऱ्या दिवशी विजांचा गडगडाट, वाऱ्यासह किरकोळ पावसाची शक्यता आहे. या वातावरणाचा प्रभाव विदर्भातील जिल्ह्यांत जाणवू शकतो. किरकोळ गारपिटीचीही शक्यता आहे. मुंबईत सकाळी आकाश ढगाळ असेल, तर दुपारी निरभ्र राहील.

> महाराष्ट्रात कमाल तापमान ३८ अं.से. तर काही ठिकाणी ४० अं.से. आहे. शनिवारपासूनच्या आठवड्यात तापमान दोन अंश सेल्सिअसने खालावण्याची शक्यता आहे. सध्या महाराष्ट्रात रात्रीचा उकाडा वा कुठेही उष्णतेच्या लाटेची शक्यता नाही.
> **- माणिकराव खुळे, हवामानतज्ज्ञ.**

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते ‘लोकराज्य’ चा वेव्हज विशेषांक प्रकाशित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३मुंबई**

मुंबईत असलेल्या ’ वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट ’ अर्थात ’ वेव्हज् २०२५ ’ या सार्वजनिक अनुभवाच्या ’ लोक ’ राज्य आणि अहेड ’ च्या विशेषांक प्रकाशन मुख्यमंत्री शेतकरी यांच्या लाभात आले.जिओ वर्ल्डमध्ये ’ वेव्हज ’ केंद्रात सुरू असलेल्या या प्रकाशन सोहळ्यास राज्याचे मुख्य सचिव सुजाता सौनिक आयोजित , मुख्य सचिव अपर मुख्य सचिव विकास खारगे , उद्योग विभाग पी. अन्बलगन , एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारा , सिडको अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल , विकासाचे (उद्योग) दीप प्रदीप सिंह कुशवाह , ’ लोकराज्य ’ चेबंधन संपादक तथा संचालक (माहिती) हेमराज बागुल , संचालक (माहिती) तथा वेवज मूळी प्रसिद्ध मोहिमेचे समन्वयक किशोर गांगुर्डे , संचालक (वृत्त-जनसंपर्क) डॉ. गणेश मूळ , उपसंचालक (वृत्त)




श्रीमती वर्षा आंधळे उपस्थित होते.माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव महासंचालक आणि ’ लोकराज्य ’ चे मुख्य संपादक ब्रिजेश सिंह यांचे मार्गदर्शन प्रकाशित ’या विशेषांक ’ शी संबंधित विविध विषय मान्यवरांचे प्रश्न लेख आहेत.

याबहुल या सागरी बलसुरक्षेसाठी किनाऱ्यांचे अंकांचे अंक , सिंहस्थ मेळा , अन्नसुरक्षा , जलसाक्षरतेतून जलव्यवस्थापन अशा विविध विषयांवर देखील मागोवा जिल्हा आला आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ३ मे २०२५ शहर/ग्रामिण


# पेसा क्षेत्रातील शिक्षक भरती प्रकरणी आमदार प्रतापदादा अडसड यांची मध्यस्थी

## आ. प्रताप अडसड यांचा पुढाकार : झेडपी प्रशासनाने मागविले शासनाला मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती :** शासनाचा आदेश असतानाही मेळघाटमधील बीएड, डीएड बेरोजगार उमेदवारांना कंत्राटी शिक्षक म्हणून भरती केलेली नाही. त्यामुळे मेळघाटात अनेक पदे रिक्त असून, कंत्राटी शिक्षकांची भरती करावी, या मागणीसाठी आदिवासी समाज विकास संघटना कृती समितीच्या वतीने जिल्हा परिषदेसमोर २९ एप्रिल पासून एप्रिलपासून पात्र उमेदवारांसह बेमुदत उपोषण सुरू केले होते. या उपोषणाची दखल घेत २ मे रोजी आमदार प्रतापदादा अडसड यांच्या पुढाकारातून अखेर शुक्रवारी उपोषण सोडले. पेसा क्षेत्रातील शिक्षक भरती संदर्भातील मुद्यावर आ.अडसड यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांच्यासोबतच चर्चा केली. यावेळी चर्चेअंतीम



पेसा क्षेत्रातील शिक्षक भरती संदर्भात शासनाकडे मार्गदर्शन मागविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार शिक्षणाधिकारी डॉ.अरविंद मोहरे यांनी याबाबत आमदार प्रतापदादा अडसड व सीईओंच्या मार्फत यासंदर्भात शासनाकडे मार्गदर्शन मागविण्यात येत असल्याचे लेखी पत्र दिले

अनुसूचित क्षेत्रातील पेसाअंतर्गत सरळ सेवेची पदे भरण्याचे शासनाचे आदेश आहेत. २३ एप्रिल २०२५ रोजी हे आदेश पारित केले आहेत. मेळघाटात कंत्राटी शिक्षकांची अनेक पदे रिक्त झाली असून,एप्रिलपासून पात्र उमेदवारांसह बेमुदत उपोषण सुरू केले होते. पेसा क्षेत्रातील आदिवासी मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा उपोषण कर्त्याचे म्हणणे आहे. शासनाच्या आदेशानुसार पेसा क्षेत्रातील रिक्त पदांवर स्थानिक अनुसूचित जमाती संवर्गातील डीएड, बीएडधारकांची नियुक्ती करावी लागते. मात्र, यानुसार जिल्हा परिषद प्रशासनाकडून अंमलबजावणी होत नसल्याचा भावना उपोषण कर्त्यानी व्यक्त केल्या होत्या. २०२४-२५मध्ये शासन-प्रशासनाकडून शिक्षकांची ऑनलाइन बदली प्रक्रिया पूर्ण झाली आहे.मेळघाटमधून बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करून तसेच बिगर पेसा क्षेत्रातील बदली झालेल्या शिक्षकांना पेसा क्षेत्रात पाठविण्यात येऊ नये. कारण, बदली झालेल्या सपाटी भागातील शिक्षक पेसा क्षेत्रात रुजू झाल्यास मेळघाटातील डीएड, बीएड बेरोजगार उमेदवार कंत्राटी शिक्षक पदापासून वंचित राहतील.त्यामुळे तातडीने पेसा क्षेत्रातील शिक्षक भरती घेण्याची मागणी बेरोजगार उमेदवारांनी उपोषण सुरू केले होते.

अखेर याची दखल घेत आमदार प्रतापदादा अडसड याच्या मध्यस्थीते यावर तोडगा काढण्यात आला. यासंदर्भात शासनाकडे मार्गदर्शन मागविण्याचा निर्णय घेण्यात तसे पत्र उपोषण कर्ते किशोर मारगाये, संजय धांडे, सुरेश दारसिंबे, दिलीप कास्देकर आदींचा समावेश आहे. देवून उपोषण सोडविण्यात आले. यावेळी याप्रसंगी आमदार प्रतापदादा अडसड,हिरालाल मावस्कर, सुधीर पाटील,दिलीप जावरकर,धुर्वे,माजी झेडपी सदस्य रविंद्र मुंदे आदी उपस्थित होते.

# आज आणि उद्या भद्रावती येथे पत्रकारांचे राज्यस्तरीय अधिवेशन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३चांदूरेल्वे–** अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने पत्रकारांचे दोन दिवसीय खुले राज्यस्तरिय अधिवेशन ३ व ४ मे रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील राजमनी गार्डन व लॉन, रेल्वे स्टेशन रोड, भद्रावती येथे आयोजित केले आहे.या अधिवेशनाचे उद्घाटन ४ मे रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक उईके यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी अर्थमंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार राहणार आहे. स्वागताध्यक्ष आमदार करण देवतळे आणि प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य अधिस्विकृती समिती अध्यक्ष तथा सहयोगी संपादक दै. लोकमत यदू जोशी, दै. महाराष्ट्र टाईम्स, नागपूरचे संपादक श्रीपाद अपराजीत, खा. प्रतिभा धानोरकर, खा. डॉ. नामदेव किरसान, माजी खासदार मारोतराव कोवासे, माजी खासदार अशोक नेते, आ. विजय वडेट्टीवार, आ. किर्तीकुमार भांगडिया, आ. देवराव भोंगळे, आ. किशोर जोरगेवार, आ.ॲड. अभिजीत वंजारी, आ. संदीप जोशी, आ.डॉ. मिलिंद नरोटे, आ. सुधाकर अडबाले, आ.धर्मराव बाबा आत्राम, माजी राज्यमंत्री अंबरीश आत्राम, माजीआमदार देवराव होळी, माजी आमदार डॉ. नामदेव उसेंडी, आ. राजु तोडसाम, आ. रामदास मसराम आणि दैनिक देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूरचे अधिष्ठाता प्रा.डॉ. विश्वनाथ साबळे तर विशेष निमंत्रित म्हणून नेत्रतज्ज्ञ डॉ. चेतन खुटेमाटे, शिक्षण महर्षी पी. एस. आंबटकर आदी मान्यवराची उपस्थित राहणार आहे. यावेळी 'फ्रेम' स्मरणिकाचे प्रकाशन तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे. या अधिवेशनाला सर्व पत्रकारांनी उपस्थित राहावे असे आवाहन अ.भा.ग्रा.पत्रकार संघाचे केंद्रीय अध्यक्ष मनोहर सुने, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख, केंद्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान, महासचिव सुरेश सवळे, उपाध्यक्ष राजेंद्र भुरे, प्रदीप जोशी, सचिव अशोक पवार, अशोक यावूल, प्रा. रवींद्र मेंढे, बाबाराव खडसे, बाळासाहेब सोरगीवकर, अभिमन्यू भगत, अंबादास सिनकर, जयश्री पंडागडे, ॲड. किरण भुते, प्रसिध्दी प्रमुख शहजाद खान, चांदूर रेल्वे तालुकाध्यक्ष राजीव शिवणकर, तालुका सचिव इरफान आदींनी केले आहे.

# यंदा मान्सून वेळेत होणार दाखल

## एल निनो, ला निना, द्विध्रुवीय घटकांचाही परिणाम नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३पुणे–** भारतीय उपखंडासाठी अत्यंत उपयुक्त आणि महत्त्वाचा असणारा मान्सून मागील वर्षीप्रमाणे, यंदाही शेतकर्यांना सुखावण्याची शक्यता आहे. मान्सूनवर एल निनो, ला निना किंवा हिंद महासागरातील द्विध्रुवीय घटकांचाही परिणाम होणार नाही. त्यामुळे यंदाचा मान्सून नेहमीप्रमाणे सरासरी इतका आणि वेळेत राज्यात दाखल होईल, अशी माहिती राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेचे माजी संशोधक आणि मान्सून अभ्यासक डॉ. एम. आर. रमेश कुमार यांनी दिली आहे.

डॉ. रमेशकुमार म्हणाले, स्कायमेट आणि भारतीय हवामान खात्याकडून मान्सूनचा पूर्व अंदाज वर्तवण्यात आला आहे. यापुढील अनुमान १५ मे दरम्यान व्यक्त करण्यात येईल. यात मान्सूनची एकूण अचूकता स्पष्ट होईल.

मात्र, अनेक वर्षांपासून केलेल्या अभ्यासाच्या आधारे असे म्हणता येईल. गेल्यावर्षीप्रमाणे यंदाही मान्सूनवर एल निनो, ला निना किंवा हिंद महासागरातील द्विध्रुवीय घटकांचाही परिणाम



होणार नाही. त्यामुळे यंदाचा मान्सून नेहमीप्रमाणे सरासरी इतका बरसेल आणि केरळमध्ये वेळेत १ जूनला आणि ६ जूनला राज्यात दाखल होईल, ७ किंवा ८ जूनला तो महाराष्ट्रात सुरू होईल. गेल्यावर्षी भारतीय उन्हाळी पावसावर मान्सून ट्रफ आणि ऑफशोअर ट्रफ यासारख्या स्थानिक सिनोप्टिक परिस्थितीचा परिणाम झाला होता.

केरळमध्ये तो ३० मे रोजी, म्हणजे १ जून या त्याच्या नेहमीच्या आधी आला होता. देशात मान्सूनचा पाऊस जोरदार होता. संपूर्ण देशात ९६७.२ मिमी पाऊस पडला, जो हवामानशास्त्रीय सरासरी ९००.४ मिमी पेक्षा ७ टक्के जास्त होता.

गेल्यावेळी जुलैमध्ये मान्सूनच्या पावसाची तीव्रता अधिक होती. ८ जुलै २०२४ रोजी गोव्यात एकाच दिवशी २३५ मिमी इतका विक्रमी पाऊस पडला होता.

गेल्या १२४ वर्षांतील हा सर्वात जास्त पाऊस जुलै होता. जुलैच्या अखेरीस, बहुतेक पर्जन्यमापक केंद्रांवर १०० इंचापेक्षा जास्त पाऊस पडला, एकूण हंगामी सरासरी फक्त दोन महिन्यांतच पूर्ण झाली होती. गोव्यात दोन ठिकाणी ५००० मिमी पेक्षा जास्त पाऊस पडला, तर काही ठिकाणी ४००० मिमी पेक्षा जास्त पाऊस पडला. दाबोळीच्या पर्जन्यमापक केंद्रात सर्वात कमी १३८ इंच (३५१२.१ मिमी) पाऊस पडला, तर वाळपईमध्ये २१७ इंच (५५३६.२ मिमी) पाऊस पडला.

३६ हवामानशास्त्रीय उपविभागांमध्ये गोवा राज्य सर्वात जास्त प्रभावित झालेल्या प्रदेशांपैकी एक होते.

# कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या तक्रारींसाठी 'शी-बॉक्स' पोर्टलवर नोंदणी अनिवार्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती** –कामाच्या ठिकाणी महिलांचे होणारे लैंगिक शोषण रोखण्यासाठी केंद्र सरकारने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. महिला व बालविकास मंत्रालयाने 'शी-बॉक्स' (SHe-Box - Sexual Harassment electronic Box) हे ऑनलाइन तक्रार निवारण पोर्टल सुरू केले आहे. आता या पोर्टलवर सर्व खाजगी आस्थापनांना नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. या कायद्यानुसार, ज्या आस्थापनांमध्ये १० किंवा



त्याहून अधिक कर्मचारी आहेत, तेथे अंतर्गत तक्रार निवारण समिती असणे आवश्यक आहे. आस्थापनांनी https://shebox.wcd.gov.in/ या संकेतस्थळाला भेट देऊन 'Private Head Office Registration' या पर्यायावर क्लिक करावे. त्यानंतर आवश्यक माहिती भरून आणि मागितलेली कागदपत्रे (उदा. कंपनीचा नोंदणी क्रमांक, जीएसटी क्रमांक, पॅन क्रमांक) अपलोड करून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करता येईल. 'शी-बॉक्स' पोर्टलमुळे महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या तक्रारी ऑनलाइन नोंदवणे आणि त्याचा पाठपुरावा करणे सोपे होणार आहे. तसेच, प्रशासनाला या तक्रारींवर वेळेत आणि प्रभावी कार्यवाही करणे शक्य होईल. सर्व खाजगी आस्थापनांनी या निर्देशांचे पालन करून आपल्या संस्थेची 'शी-बॉक्स' पोर्टलवर त्वरित नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी केले आहे.

# सावली सोडणार साथ! अनुभवता येणार शून्य सावली दिवस

## २५ मे रोजी १२ ते १२.३० दरम्यान सूर्य डोक्यावर आल्यावर सावली दिसेनाशी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती:** 'सावली कधीच आपली साथ सोडत नाही' असे वारंवार सांगितले जात असले, तरी येत्या २५ मे रोजी काही मिनिटांसाठी सावली प्रत्येकाची साथ सोडणार आहे. या दिवशी दुपारी १२ ते १२.३० दरम्यान सूर्य डोक्यावर आल्यावर सावली दिसेनाशी होणार आहे. या 'झीरो शॅडो'चे निरिक्षण करण्यासाठी खगोल अभ्यासकांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. वर्षातील असे दोन दिवस असतात की ज्या दिवशी भर दुपारी काही क्षण आपली सावलीही आपली साथ सोडून देते. या दिवसांना 'शून्य सावलीचा दिवस'



असे म्हटले जाते. त्याचाच अनुभव येत्या २५ मे रोजी दुपारी १२ ते १२.३० या दरम्यान ५२ सेकंद अमरावतीकरांना प्रत्यक्ष घेता येणार आहे. खगोल अभ्यासकांनी ही माहिती दिली आहे. पृथ्वीवर मकरवृत्ताच्या दक्षिणेकडील भागात आणि कर्कवृत्ताच्या उत्तरेकडील भागात सूर्य कधीच डोक्यावर येत नाही. तो नेहमी उत्तरेकडे किंवा दक्षिणेकडे दिसतो. पण, या दोन टोकांच्या वृत्तांमधील नागरिकांना वर्षातून दोनदा सूर्य बरोबर डोक्यावर आलेला अनुभवता येतो. जेव्हा सूर्य डोक्यावर येतो, तेव्हा आपली सावली सरळ आपल्या पायाखाली पडते आणि जणू काही ती सावली गायब होते.

शून्य सावलीचा हा एक रोमांचकारी अनुभव आहे. खगोलप्रेमी अमरावतीकरांनी २५ मे रोजी दुपारी १२ ते १२.३० या दरम्यान ५२ सेकंदांसाठी आपली सावली गायब होण्याचा रोमांचकारी अनुभव प्रत्यक्ष घ्यावा, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेचे हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर व प्रवीण गुल्हाने यांनी केले आहे.

### शून्य सावली दिवस म्हणजे नेमके काय?

सूर्याचा उत्तरायण आणि दक्षिणायन असा भासमान मार्ग पृथ्वीच्या २३.५०ओ दक्षिण आणि उत्तरेकडे असतो म्हणजेच कर्कवृत्त आणि मकरवृत्त यादरम्यान असणाऱ्या सर्व भूभागावर सूर्य वर्षातून दोनदा दुपारी डोक्यावर येतो. त्यामुळे वर्षातून दोनदा शून्य सावली दिवस येतात. उत्तरायण होताना एकदा आणि दक्षिणायन होताना एकदा. तसेच सूर्य दररोज ०.५० ओ सरकतो म्हणजे तो एकाच अक्षवृत्तावर २ दिवस राहतो,त्यामुळे एकाच ठिकाणावरून दोन दिवस शून्य सावली अनुभवता येऊ शकते. भारताचा विचार केल्यास अंदमान-निकोबार बेटावर इंदीरा पॉइंट येथे ६.७८ओ अक्षवृत्तावर ६ एप्रिल आणि ५ सप्टेंबर रोजी दुपारी सूर्य अगदी डोक्यावर असतो आणि शून्य सावली दिवस घडतो.

# महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी दिली मध्य झोन कार्यालयाला भेट

## महानगरपालिका आयुक्तांनी केली ई-ऑफिस प्रणाली ची तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती** शुक्रवार दिनांक २ मे,२०२५ रोजी महानगर पालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी महानगरपालिका मध्य झोन कार्यालयाला भेट देवून ई-ऑफिस प्रणाली व कोठ्या वरील भंगार साहित्याची तपासणी केली.या पाहणी दरम्यान आयुक्त सचिन कलंत्रे यांनी मध्य झोन कार्यालयात ई-ऑफिस प्रणालीची तपासणी केली असता सदर कर्मचा-यांकडून ई-ऑफिस प्रणाली बाबत माहिती जाणून घेतली. सदर प्रणालीद्वारे कशा पध्दतीने काम केले जात आहे याची माहिती मध्य झोनच्या कर्मचा-यांकडून घेतली. यावेळी आयुक्तांच्या समवेत मध्य झोनच्या कर्मचा-यांकडून ई-ऑफिस प्रणाली प्रात्यक्षिक करण्यात आले. यावेळी आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे म्हणाले की, महानगरपालिका क्षेत्रात ई-ऑफिस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मनपा स्तरावरील कार्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ई-ऑफिस प्रणालीचे प्रशिक्षण देण्यात आले होते. प्रशासकीय कामकाज गतिमानतेने व्हावे, या उद्देशाने प्रशासनाने ई-ऑफिस प्रणाली सुरू केली आहे. या प्रणालीमुळे झटपट कामे मार्गी लागतील, नागरिकांच्या तक्रारी त्वरित संबंधित अधिकाऱ्यापर्यंत पोहोचतील, असे आयुक्त सचिन कलंत्रे यांनी सांगितले, तसेच विकासकामांच्या फाईल्स आता हाताळल्या जाणार नसून थेट ई-प्रणालीच्या माध्यमातून संबंधित अधिकाऱ्यापर्यंत पोहचणार असल्याचे यावेळी आयुक्तांनी स्पष्ट केले.अमरावती महानगरपालिकांतर्गत विविध विभागामध्ये निरुपयोगी वस्तु मध्य झोन क्र.२ राजापेठ च्या बाजूला असलेले मध्यवर्ती राजापेठ कोठा येथे ठेवण्यात येते. सदर निरुपयोगी भंगार वस्तु साहित्याची तपासणी महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केली. सदर साहित्य बरोबर लावण्यात आले की नाही याची वर्गीकरणाची तपासणी करण्यात आली. या पाहणी दरम्यान सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, उपअभियंता प्रमोद इंगोले,



दिनेश हंबर्डे, मंगेश कडू, अभियंता लक्ष्मण पावडे, सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी नर्मदा चव्हाण, मध्य झोनचे कर्मचारी उपस्थित होते.

# गोव्यातील प्रसिद्ध लईराई देवीच्या जत्रेत चेंगराचेंगरी

## ७ जणांचा मृत्यू, ३० जखमी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३पणजी** – गोव्यातील शिरगाव येथील प्रसिद्ध लईराई देवीच्या जत्रेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ७ भाविकांचा मृत्यू झाला, तर ३० हून अधिक जखमी झाले आहेत. शुक्रवारपासून लईराई देवीच्या यात्रेला सुरूवात झाली असून दुसऱ्या दिवशी म्हणजे आज (दि. ३) पहाटे यात्रेला गालबोट लागले. दरम्यान, अपघातात जखमी झालेल्यांची प्रकृती जाणून घेण्यासाठी मुख्यमंत्री प्रमोद सावंत घटनास्थळी पोहोचलेत.

शिरगाव येथील लईराई देवीच्या जत्रेला शुक्रवारपासून सुरूवात झाली आहे. दरवर्षी हजारो लोक या यात्रेत सहभागी होतात. यात्रेच्या पहिल्याच दिवशी चेंगराचेंगरीची घटना घडली. उत्तर गोव्याचे एसपी अक्षत कौशल यांनी या घटनेची माहिती दिली.

गोव्यातील शिरगाव येथील लईराई देवी मंदिरात चेंगराचेंगरीमुळे ७ जणांचा मृत्यू झाला आणि ३० हून अधिक जण जखमी झाले. जखमींना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले आहे. त्यापैकी पाच भाविकांची प्रकृती गंभीर आहे. ही घटना पहाटेची असून जखमींना शेजारील म्हापसा रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. काहींना गोवा वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्यासह आमदार डॉक्टर चंद्रकांत शेट्ये, प्रेमेंद्र शेठ, निळकंठ हळर्णकर घटनास्थळी पोहोचले आहेत.

शिरगाव येथील देवी लईराईच्या जत्रोत्सवात झालेल्या चेंगराचेंगरीत थिवी येथील नात्यातील तिघांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये आदित्य कवठणकर (१७, अवचीतवाडो), तनुजा कवठणकर (५२) आणि यशवंत केरकर (४०, माडेल, थिवी) यांचा समावेश आहे.

# ओबीसीच्या घरकुल योजनेचा मास्टर प्लॅन फेल, उद्दिष्ट मिळेना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** मोदी आवास योजनेत २०२३-२४ मध्ये राज्यातील १० लाखांपैकी पहिल्या वर्षी जिल्ह्याला १४ हजार १७८ घरकुलाचे उद्दिष्ट दिले होते. यानंतर २०२४-२५ आणि २०२५-२६ अशा दोन वर्षापासून मोदी आवासचे उद्दिष्ट मिळाले नाही. त्यामुळे ओबीसीची घरकुलासाठी फरफट होत आहे. राज्य शासनाने सन २०२३-२४ मध्ये ओबीसी प्रवर्गासाठी राज्यात १० लाख घरकुले बांधण्याचा मास्टर प्लॅन तयार केला होता. पहिल्या वर्षात शासनाने तीन लाख घरकुले मंजूर केली. मात्र, अद्यापही सात लाख घरकुले मंजुरीच्या प्रतीक्षेत असताना दुसऱ्याच वर्षी मोदी आवास योजनेला घरघर लागली. २०२४-२५ या वर्षात राज्य शासनाने घरकुलाचे लक्ष्यांकच (टार्गेट) दिला नाही. यामुळे विविध घरकूल योजनेपासून वंचित असलेल्या इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) बेघरांची फरफट होऊ लागली आहे. आवास प्लस (प्रपत्र ड) अंतर्गत लाभार्थ्यांची नावे समाविष्ट होऊ न शकलेल्या अनुसूचित जाती, जमाती प्रवर्गातील सर्व पात्र लाभार्थ्यांना घरे देण्यासाठी राज्य शासनाच्या रमाई आवास, शबरी आवास, आदिम आवास, तसेच विमुक्त जाती भटक्या जमातीसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना आणि अहिल्यादेवी आवास योजना उपलब्ध आहेत.योजनेत तीन वर्षात राज्यात १० लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवून पहिल्या वर्षी तीन लाख घरकुलांना मंजुरी दिली. अमरावती जिल्ह्याला १४ हजार १७६ एवढे उद्दिष्ट दिले होते. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत तयार करण्यात आलेल्या आवास प्लसच्या (प्रपत्र ड) यादीमध्ये मोठ्या प्रमाणावर पात्र लाभार्थीची नावे वेगवेगळ्या कारणास्तव समाविष्टच होऊ शकली नाहीत.मोदी आवास योजनेंतर्गत सन २०२३-२४ मध्ये जिल्ह्यात १४ हजार १२२ घरकुलांना मंजुरी देण्यात आली. यापैकी आतापर्यंत १४ हजार १०४ लाभार्थ्यांना अनुदानाचे पहिला, दुसरा, तिसरा आणि चौथा टप्पा दिला. आहे. दोन वर्षात ९३१८ घरकुलाचे काम पूर्ण झाली आहेत, तर ४ हजार ८६० घरकुले प्रगतिपथावर आहेत.

### ९३१८ घरकुल पूर्ण

दोन वर्षांपूर्वी शासनाने मंजूर केलेल्या १४ हजार १७८ उद्दिष्टांपैकी आतापर्यंत ९३१८ घरकुलांची कामे पूर्ण झाली आहेत, तर ४८६० कामे प्रगतिपथावर असल्याचे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने स्पष्ट केले.



# अश्लील मॅसेज व कॉल करणाऱ्या माजी प्राचार्यावर गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३परतवाडा:**शहरातील एका प्रतिष्ठित शाळेचे सेवानिवृत्त प्राचार्य आणि सामाजिक संघटनेचे पदाधिकारी अविनाश कडू (६०) रा. गोवर्धन विहार याच्याविरुद्ध परतवाडा पोलिसठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.विवाहित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार आरोपीने अश्लील एसएमएस व व्हॉईस कॉल करून त्रास दिला असून, घरात येऊन वाईट उद्देशाने वर्तन केल्याचेहीनमूद केले आहे. तक्रारदार महिला सिव्हील लाईन परिसरात राहत असून, एका खासगी शाळेत अस्थायी स्वरूपात शिक्षिका म्हणून कार्यरत असताना त्यांची ओळख आरोपी अविनाश कडू यांच्याशी प्राचार्य पदावर असताना झाली होती. त्यामुळे त्यांच्याकडे महिलेचा मोबाईल क्रमाक होता. महिलेच्या तक्रारीनुसार, १ मे रोजी रात्री ९.३० वाजता व्हॉईस कॉलआला होता आणि घरी येतो असे सांगितले गेले. त्यावेळी घाबरलेल्या महिलेने 'सकाळीया' असे उत्तर दिले. त्यानंतर १ मे रोजी सकाळी आरोपी त्यांच्या घरी आला आणि घरात वाईट उद्देशाने वागू लागल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्याचवेळी महिलेचे पती घरी आले असता त्यांनी कडू यांना बळजबरीने घराबाहेर काढण्याचा प्रयत्न केला असता कडू यांनी शिवीगाळदेखील केली. याप्रकरणी परतवाडा पोलिसांनी भारतीय दंडसंहिता कलम ७९, ३३३, ३५१(२), ३५२ अन्वये गुन्हा नोंदवून आरोपीचा शोध सुरू केला आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून, संबंधित शिक्षकाच्या वर्तनाबाबत संताप व्यक्त केला जात आहे




# शिक्षणाला सुसंस्कारांची जोड मिळणे गरजेचे- कर्नल गाले

## दासटेकडी येथे सुसंस्कार शिबिरास प्रारंभ; १२०मुलांचा प्रवेश



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३गुरुकुंज मोझरी–** देशाचा सैनिक सीमेवर आपल्या प्राणाची आहुती देऊन देश-रक्षण करत असला तरीही दहशतवादी कारवायांमुळे देशातील परिस्थिती काहीशी विदारक आहे. सततच्या दहशतवादी कारवायांमुळे अंगावर शहारे उठतात. म्हणून खेदाने म्हणावे लागते की, आज शिक्षण व तंत्रज्ञान वाढले असले तरी त्यामुळे पाहिजे तसा सकारात्मक परिणाम दिसून येत नाही. त्यामुळे शालेय शिक्षणाला सुसंस्कारांची जोड मिळणे गरजेचे असून सुसंस्कार शिबिरे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन लेफ्टनंट कर्नल लक्ष्मण गाले यांनी केले.


श्रीगुरुदेव राष्ट्रधर्म प्रचार संस्थेच्या वतीने तालुक्यातील गुरुकुंज-मोझरी लगतच्या राष्ट्रसंत अध्यात्म केंद्र, दासटेकडी येथे श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिराचे १ मे रोजी उद्घाटन झाले, या वेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक संघाचे पुरुषोत्तम गावंडे, तर प्रमुख मान्यवर म्हणून डॉ. गुणवंत डहाणे, बाबूराव धोटे, डॉ. चंदनसिंह राजपूत, समितीचे ज्येष्ठ जीवन-प्रचारक रामदास चोरोडे, अरुण सालोडकर, नामदेव गव्हाळे, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, दिनकर चोरे, रमेश मोकदम, सुरेश घाटोळ, महादेव कांडलकर, डॉ. कविता येनूरकर, कमल गुडधे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक संस्थेचे सचिव प्रमोद पोकळे यांनी केले. विदर्भातील १२० शिबिरार्थ्यांनी शिबिरात प्रवेश नोंदवला.संपूर्ण लोक-सहकार्यावर चालणाऱ्या या शिबिरात पहाटे ४.३० ते रात्री ९.३० पर्यंत आदर्श दिनचर्येत, संत-महापुरुषांचे चरित्रदर्शन, धर्म-समभाव, राष्ट्रीय एकात्मता, स्वदेश-प्रेम, वक्तशीरपणा, आज्ञापालन, स्वावलंबन, सेवावृत्ती, शिस्त, श्रमदान, राष्ट्रभक्ती, निर्भयता, व्यसन-निर्मूलन, अनिष्ट रुढी-परंपरा उच्चाटन, अंगभूत कलेचे दर्शन, व्यक्तिमत्व विकास इत्यादी जीवनमूल्ये, देशापुढील आव्हाने तथा व्यायाम व भजन-संगीताचे शिक्षण सेवाभावी शिक्षकांकडून दिले जाणार आहे. २० दिवस चालणाऱ्या या शिबिरासाठी शिबिरप्रमुख रवींद्र ढवळे, रूपेश मोरे, गणेश दरवरे, योगेश मेंढे, मयूर इंगळे, अरुण फंदे, निवृत्ती इंदुरकर, अभिनय काळे तर व्यवस्थापनाची जबाबदारी रवींद्र वानखडे सांभाळणार आहेत. सूत्रसंचालन रवींद्र ढवळे यांनी केले, तर आभार डॉ. नरेंद्र तराळे यांनी मानले. या वेळी शिबिरार्थ्यांचे पालक उपस्थित होते. प्राचीन काळी मुले आई-वडिलांपासून दूर राहून संपूर्ण शिक्षण घ्यायची. तशीच काहीशी परंपरा ही दास टेकडीवरील सुसंस्कार शिबिराद्वारे जोपासली जात आहे. या शिबिरात उपस्थित शिबिरार्थींवर उत्तम संस्कार व्हावेत, ते व्यसनांपासून दूर रहावेत, त्यांच्यात देशभक्ती, निडरता यावी. येथे शिकणारे सर्व समान आहोत, हे संस्कार त्यांच्यात रुजावेत तसेच वेळेचे महत्त्व, स्वत:च स्वत:ची सर्व कामे करणे, एकमेकांना सहकार्य करणे ही भावनाही त्यांच्या निर्माण करण्याचे कार्य सुसंस्कार शिबिरात केले जाते.

# ३२४ जन्म दाखल्यांची सुनावणी: नायब तहसीलदारांविरुद्ध तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–**

अचलपूर तहसीलमधून देण्यात आलेले ३२४ जन्म दाखले रद्द केले, मात्र या जन्म दाखल्यांच्या सुनावणी घेऊन आदेश देगाऱ्या नायब तहसीलदारांविरुद्ध गुन्हा दाखल करावा, अशी तक्रार भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी शनिवारी अचलपूर पोलिसांत केली आहे. याचवेळी त्यांनी अन्य एक तक्रारही केली आहे. सोमय्या यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, नायब तहसीलदार यांना सुनावणी घेऊन आदेश देण्याचे अधिकार नसतानाही त्यांनी आदेश दिले. यातील बहुतांश जन्म दाखल्यांमध्ये जोडलेले पुरावे हे बनावट आहे. त्यामुळेच अचलपूर तहसीलमधून दिलेले ३२४ जन्म दाखले रद्द केले आहे. वास्तविकता रद्द केलेले जन्म दाखले जात करून संबंधितांना नोटीस बजावणे आवश्यक आहे. कारण त्या दाखल्यांचा यापुढील काळात कुठेही गैरवापर होऊ नये, मात्र एकही रद्द केलेला दाखला अचलपूर तहसीलने जप्त केला नाही. त्यामुळे जाणादाखल्यांचे आदेश देगाऱ्या नायब तहसीलदारांवर गुन्हे दाखल करण्याचे सोमय्या यांनी तक्रारीत नमुद केले आहे. दुसरी तक्रार, हे जन्म दाखले तयार करण्यासाठी काही बनावट पुरावे जोडले आहेत. त्यामुळे हे पुरावे देणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत. या प्रकरणी सोमय्या यांनी शनिवारी अचलपूरचे ठाणेदार गजानन मेहत्रे यांच्यासोबत चर्चाही केली आहे.





# सोमवारी जिल्हा व शहर काँग्रेसचा जनता दरबार भरणार

## नागरिकांनी समस्या मांडण्याचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती** जिल्ह्यातील तसेच शहरातील नागरिकांच्या विविध समस्यांचे समाधान करण्याकरिता जिल्हा ग्रामीण व शहर काँग्रेसच्या वतीने काँग्रेस भवन येथे सोमवारी (ता.पाच) दुपारी १ वाजतापासून जनता दरबार आयोजित करण्यात आलेला आहे.या जनता दरबाराला खासदार बळवंत वानखडे यांच्यासह जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी आमदार वीरेंद्र जगताप, शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी मंत्री सुनील देशमुख, विलास इंगोले, मिलिंद चिमोटे आर्दीची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.शेतकरी सर्वसामान्य, नागरिक व गरीब तसेच महिला, युवती व बेरोजगारांच्या अनेक समस्या ग्रामीण भागात आहेत, परंतु त्याचे निराकरण शासनाकडून केले जात नाही, अशा अनेक समस्यांचे निराकरण व्हावे या उद्देशाने जिल्हा काँग्रेस व शहर काँग्रेसच्या वतीने संयुक्तपणे काँग्रेस भवन येथे जनता दरबाराच्या आयोजन केलेले आहे. त्यामुळे नागरिकांनी आपापल्या समस्या घेऊन या जनता दरबारात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी केलेले आहे.समस्या निकाली काढण्याबाबत खासदार बळवंत वानखडे यांच्याकडून शासन स्तरावर देखील पाठपुरावा केला जाणार आहे. याशिवाय स्थानिक समस्यांचे निराकरण तातडीने केले जाणार आहे.





# दस्तुर नगरात एटीएम फोडले


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती** :बँकेचे एटीएम फोडण्याची घटना राजापेठ पोलिसस्टेशन हद्दीतील दस्तुरनगर फरशी स्टॉप येथे घडली.फिर्यादी प्रशांत सुभाष वाटाणे (४२) रा. नवसारी हे एसबीआय मध्ये मॅनेजर आहेत. ते शुक्रवारी सकाळी ड्युटीवर गेले असता त्यांना बँकेचे एटीएम मशीन समोरील लॉक तुटलेले दिसले. त्यांनी पाहणी केली असता मशीन फोडल्याची खात्री झाली. त्यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# चुकीच्या नियोजनामुळे स्मार्ट कॉटन प्रकल्प फसला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३नागपूर :** चीनने कापसाच्या धाग्याचा पिवळेपणा (आरडी) चे कारण पुढे करून महाराष्ट्रातील कापूस नाकारला. यावर उपाय म्हणून राज्य सरकारने २०१९ मध्ये स्मार्ट कॉटन प्रकल्पाची घोषणा केली. त्यासाठी वर्ल्ड बँकेने ३२० कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य केले. कापसाची आरडी गुलाबी बोंडअळीमुळे खराब झाली आणि सरकारने त्याकडे लक्ष न देतात जिनिंग तंत्रज्ञान अद्ययावत करण्यासोबच प्रकल्पाच्या प्रचार-प्रसारावर अधिक भर देत संपूर्ण निधी खर्च केला.



सरकारने शेतकऱ्यांच्या फायद्याचा स्मार्ट कॉटन प्रकल्प गुंडाळण्याची घोषणा केली. सन २०१९ चीनने महाराष्ट्रातील कापूस खरेदी करण्यास नकार दिला. यावर उपाय शोधण्यासाठी सरकारने विधानसभा निवडणुकीच्या आधी या प्रकल्पाची घोषणा केली. मुळात कापसाची आरडी गुलाबी बोंडअळीमुळे खराब झाली होती.आरडी सुधारण्यासाठी गुलाबी बोंडअळी प्रतिबंधक 'व्हीआयपी-३ ए' जीन असलेले बोलगार्ड-३ बियाणे उपलब्ध करून देणे गरजेचे होते. मात्र, या प्रकल्पात बियाणे तंत्रज्ञानावर मुळीच विचार करण्यात आला नाही. आरडी सुधारण्यासाठी सरकारने जिनिंग तंत्रज्ञान अद्ययावत करण्यावर भर देत वर्धा जिल्ह्यात अपग्रेड जिनिंग सुरू करण्याचा निर्णय घेतला. या संपूर्ण प्रक्रियेत तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींच्या मतांवर विचार करण्यात आला नाही.

### रुईच्या पॅरामीटरकडे कानाडोळा

कापसाची उपयोगिता व वापर हा धाग्याची लांबी, आरडीसह इतर ११ पॅरामीटरवर अवलंबून असते. आखूड, मध्यम, लांब व अतिरिक्त लांब या प्रत्येक धाग्याच्या कापसाचा वापर केला जात असून, त्यावर त्यांचे दर ठरतात. हे सर्व पॅरामीटर विचारात घेऊन या प्रकल्पांतर्गत कापसाचे उत्पादन, जिनिंग व विक्री करण्याकडे सपशेल कानाडोळा करण्यात आला आणि प्रकल्प फसला.

# लाडक्या बहिणींसाठी मागासवर्गीय आणि आदिवासींचा निधी वळवला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३मुंबई :** लाडकी बहीण योजनेचा हप्ता देण्यासाठी सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास खात्याचा निधी वळवण्यात आला आहे. या दोन्ही विभागांचे अनुक्रमे ४१० कोटी ३० लाख आणि ३३५ कोटी ७० लाख रुपये महिला आणि बालविकास विभागाकडे वळविण्यात आले आहेत. महिला आणि बालविकास विभागाने शुक्रवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला. राज्य सरकारने सन २०२५-२६ या वर्षीच्या अर्थसंकल्पात अनुसूचित जाती उपयोजनेसाठी २२ हजार ६५८ कोटी तर अनुसूचित जाती उपयोजनेसाठी २१ हजार ४९५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यापैकी सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य विभागासाठी सहायक अनुदान म्हणून ३ हजार ९६० कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यातील ४१० कोटी ३० लाख रुपयांचा निधी महिला आणि बालविकास विभागाला देण्यात आला आहे.



एप्रिल महिन्याचा सन्मान निधी पात्र लाभार्थी लाडक्या बहिणींच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यांमध्ये जमा करण्याची प्रक्रिया आजपासून सुरू करण्यात येत आहे. पुढील २ ते ३ दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होईल आणि सर्व पात्र लाभार्थींना निधी थेट त्यांच्या खात्यात प्राप्त होईल.**अदिती तटकरे,** महिला व बालकल्याण मंत्री.

# अभिष्टचिंतन सोहळ्यात कार्यकर्ता, पदाधिकाऱ्यांचा सैलाब

## प्रवीण तायडे यांच्या दिलेल्या शब्दाला पूर्ण करणार बावनकुळे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३परतवाडा**

अचलपूर विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्याला राज्याचे महसूल मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते , निवडणूक दरम्यान जनतेला दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी प्रवीण तायडे यांच्यासोबत ताकतीने उभे असल्याची गवाही बावनकुळे यांनी मंचावरून नागरिकांना संबोधित करताना दिली , या सोहळ्याला खा.डॉ अनिलजी बोंडे , माजी खासदार नवनीत राणा , अशोकराव बनसोड , संगीता शिंदे , नितीन गुळदे , रुपेश ढेपे , प्रमोद कोरडे, कुंदन यादव , शंकर मालखेडे , विशाल काकड भाजपचे कार्यकर्ता व पदअधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते , याप्रसंगी चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले जाती निहाय जनगणना करण्याचा मोदी सरकारने घेतलेला निर्णय आर्थिक व सामाजिक सलोखा निर्माण करणारा आहे याकरिता राज्यातील प्रत्येक पक्षाच्या बुथ स्तरावर ग्रामविकास मंत्र्यांशी चर्चा करत प्रत्येक ग्रामपंचायतीतून पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या अभिनंदनचा ठराव घेतल्या जाईल , प्रवीण तायडे हा कलाकार माणूस आहे अगदी कमी दिवसात सामान्य जनतेसाठी राबवलेल्या उपक्रमामुळे राज्यातील २५ आमदारांच्या यादीत तायडे यांचे नाव आहे , भविष्यात हा मतदार संघ भाजपचाच राहणार निवडणूक दरम्यान दिलेले आश्वासन परतवाडा अमरावती मार्ग , फिन्ले मिल सुरू करणे , शकुंतला ब्रॉडगेज करणे यासारखे मतदारसंघातील प्रमुख समस्यांकडे आमचे लक्ष केंद्रित आहे , केंद्र स्तरावर येणाऱ्या दहा ते पंधरा दिवसात मीटिंग लावून मतदार संघातील प्रमुख हे तिन्ही मुद्दे लवकरच सोडविण्यात येणार आहे , आमदारांच्या या अभिष्टचिंतन सोहळ्यात दिव्यांगांना सायकल व ई रिक्षा वाटप करण्यासोबतच जेष्ठ पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला , आमदार प्रवीण तायडे म्हणाले जनतेच्या आशीर्वादाने मतदार संघाचा मागील वीस वर्षाचा ग्रहण संपला आणि मी आमदार झालो अचलपूर मतदार संघामध्ये रोजगार , विकास व सामान्य जनतेच्या प्रत्येक समस्या कडे लक्ष देऊन ते प्रामाणिकपणे सोडविण्याचा संकल्प माझा राहणार आहे.

# 'एक देश एक निवडणूक' हे भारताचे पुढचे पाऊल : अविनाश धर्माधिकारी यांची रोखठोक भूमिका

## पाकिस्तान पुरस्कृत इस्लामिक धर्मांधतेपासून जगाला धोका - धर्माधिकारी : अमरावती सिटीजन फोरम तर्फे परिसंवाद कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

देशात सतत निवडणुका राहिल्या तर देश हिताचे परिणामी कटू निर्णय घेण्यास कोणतेही सरकार समर्थे दाखवणार नाही. त्यामुळे नव्या भारताचे पुढचे पाऊल हे 'एक देश एक निवडणूक' असेल असे स्पष्ट मत ज्येष्ठ सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी नोंदवले. तर पहेलगाम हल्ल्यावर प्रकाश टाकताना धर्माधिकारी म्हणाले, पाकिस्तान पुरस्कृत इस्लामिक दहशतवादापासून भारतालाच नव्हे तर जगाला धोका आहे. तो वेळीच ओळखून अशा प्रवृत्तींना ठेचून काढलं पाहिजे असेही त्यांनी अधोरेखित केले.

अमरावती सिटीजन फोरम तर्फे संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे शुक्रवारी (ता.०२) 'एक देश एक निवडणूक' या परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य हेमंत काळमेघ, परिसंवादात सहभागी वक्ते ज्येष्ठ सनदी लेखापाल राजेश चांडक, डॉ.किशोर फुले तर विशेष अतिथी म्हणून राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे, इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्ष डॉ.अलका कुथे, माजी खासदार अनंतराव गुढे, विचार पिठावर उपस्थित होते.

एक देश एक निवडणूक, जागतिक दहशतवाद आणि भारतासमोरील आव्हान या दोन प्रमुख विषयावर अमरावती सिटीजन फोरम तर्फे परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात बोलताना जेष्ठ सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी म्हणाले की, 'एक देश एक निवडणूक' याची विस्तृत मांडणी करताना बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टीचा या ठिकाणी उहापोह करणे आवश्यक आहे. आंबेडकरांचे ज्यावेळी देशाने ऐकले नाही त्यावेळी देशाला देशव्यापी किंमत मोजावी लागली. काश्मीरचे ३७० कलम त्यांना नको होते. भारतीय लोकशाहीचे विलक्षण सौंदर्य अधोरेखित करताना धर्माधिकारी म्हणाले की भारतीय मतदार हा प्रगल्भ आहे. देश परिवर्तनाच्या कालखंडातून जात आहे. जातीय जनगणना हा त्यातील प्रमुख पैलू आहे. सप्टेंबर २०२३ रोजी




संसदेच्या दोन्ही सभागृहाचे अधिवेशन बोलवण्यात आलं. 'नारी शक्ती वंदन' अधिनियम लागू करण्यासाठी हे अधिवेशन घेण्यात आलं. यातून समाजामध्ये स्त्रीचे स्थान आणि राजकीय दृष्ट्या तिचे महत्त्व अधोरेखित करणारे हे पाऊल होते. एक राष्ट्र एक निवडणूक या मुद्द्यावर विरोधकांकडून वैचारिक मांडणी करणे अपेक्षित असताना केवळ बाल्यावस्थेत असलेली भूमिका विरोधकांकडून दुर्दैवाने घेतली जात आहे. प्रधानमंत्री आणि गृहमंत्र्यांना या देशातील विरोधकांना विरोध करायचा आहे. जो अनाठाई आहे. राज्यांच्या अधिकारावर गदा येईल, प्रादेशिक पक्षांची अस्मिता धोक्यात येईल ही मांडणी विरोधकांकडून सुरू आहे. ती चुकीची आहे हा उल्लेख करताना धर्माधिकारी यांनी ऑक्टोंबर १९९९ मध्ये भाजप सेना सरकारच्या काळातील लोकसभा व विधानसभा निवडणुकांचा एकत्रित संदर्भ दिला. कोणती निवडणूक आहे, त्यातील मुद्दे लक्षात घेऊन भारतीय मतदार आपला कौल देतो. कर्नाटक राज्यात झालेल्या लोकसभा विधानसभा निवडणुका एकत्रित होत असतानाच तेथील मतदारांकडून प्रादेशिक आणि राष्ट्रीय असा समतोल साधला. केंद्र सरकारने लागू केलेल्या तीन कृषी कायद्यान बद्दल बोलताना धर्माधिकारी यांनी स्पष्ट केलं की उत्तर प्रदेशातील विधानसभेचे प्रतिबिंब हे केंद्रातल्या सरकारमध्ये दिसतो. त्यावेळीच्या उत्तर प्रदेशातील निवडणुका लक्षात घेता केंद्राला हे तिन्ही कायदे परत घ्यावे लागले. म्हणून देश हिताचे कठोर निर्णय सतत निवडणुका राहिल्या तर कोणत्याही सरकारला घेता येणं अशक्य असल्याचेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रीती राऊत तट्टे, संचालन सुमित राऊत यांनी तर आभार डॉ. पुनम बेलोकार यांनी मानले. या कार्यक्रमाला अमरावतीकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**तर यांना ठोकून काढलं पाहिजे**

छत्रपती शिवरायांचे आपण वारसदार आहोत. कोणतेही लढाई गरम डोक्याने लढायची नसतो, असं सांगत अविनाश धर्माधिकारी म्हणाले संकट आल्यावर अफजलखानाची बोट छाटली गेलीच पाहिजे. शाहिस्तेखाना वरील हल्ला असो की सुरतेची लूट असो ही शिकवण आपल्याला शिवरायांकडून मिळालेली आहे. बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार झाले. पहेलगामच्याही मागे चीन असल्याचं आता बोलले जात आहे. त्यामुळे सामर्थ्यशाही लोकशाही म्हणून पुढे जायचं असेल तर यांना ठोकून काढलं पाहिजे आणि नवा भारत ते केल्याशिवाय राहणार नाही, अशीही रोखठोक भूमिका अविनाश धर्माधिकारी यांनी मांडली. तर परिसंवादातील सहभागी वक्ते राजेश चांडक, डॉ.किशोर फुले यांनीही एक देश एक निवडणूक या बाजूने आपल्या भाषणातून कौल दिला. प्रशासकीय व्यवस्था, निवडणुकांवर होणारा खर्च, सुरक्षा यंत्रणांवर येणारा ताण यावर देखील चांडक, फुले यांनी भाष्य केलं.

# पी. आर. पोटे पाटील कॉलेजमध्ये करिअर गाईडन्स व कौन्सिलिंग कार्यक्रमाचे आयोजन

## दहावी-बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना आर्किटेक्चर क्षेत्रातील संधींबाबत मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर व द इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअर्स (इंडिया), अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच करिअर गाईडन्स व कौन्सिलिंग या विशेष कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

आपल्या प्रास्ताविकामध्ये कॉलेजचे प्राचार्य आर्किटेक्ट संजय देशमुख यांनी संस्थेच्या वार्षिक उपक्रमांचा आढावा सादर केला. दरवर्षी करियर कौन्सिलिंग प्रोग्राम आयोजित करून भविष्या च्या दृष्टीने सर्व शैक्षणिक संधीची माहिती विद्यार्थ्यांना पोहचावी व योग्य मार्गदर्शन मिळावे, हा आमचा उद्देश असल्याचे सांगितले.

यानंतर महाविद्यालयातर्फे सादरीकरणामध्ये दहावी व बारावीनंतर उपलब्ध सर्व शैक्षणिक संधीचा आढावा दिला. तसेच आर्किटेक्चर अभ्यासक्रमांची तपशीलवार माहिती देण्यात आली यात डिप्लोमा इन आर्किटेक्चर, डिप्लोमा इन इंटेरियर डिझाईन



तसेच बी. आर्च. (पदवी) या अभ्यासक्रमांविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. नव्याने सुरू झालेल्या डिप्लोमा अभ्यासक्रमांना कॉन्सिल ऑफ आर्किटेक्चर व एम.एस.बी.टी.इ यांची मान्यता लाभलेली असून, यामध्ये दहावी उत्तीर्ण विद्यार्थी कोणतीही प्रवेश परीक्षा न देता प्रवेश घेऊ शकतात. तर बी. आर्च. अभ्यासक्रमासाठी बारावी उत्तीर्ण व छ-ढ- परीक्षा अनिवार्य असल्याचे आर्किटेक्ट स्नेहल विधळे यांनी पी. पी. टी. सादरीकरणाच्या माध्यमातून सविस्तरपणे स्पष्ट केले.

प्रमुख पाहुणे आर्किटेक्ट सतीश देशमुख यांनी आपल्या अनुभवांवर आधारित विचार मांडले. त्यांनी आपल्या काळात योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे आर्किटेक्चर क्षेत्रात प्रवेश घेण्यासाठी भोगाव्या लागणाऱ्या अडचणींचा उल्लेख केला. मात्र, या सर्व अडचणींवर मात करून त्यांनी आर्किटेक्ट म्हणून प्राप्त केलेल्या विविध यशाच्या संधींचा प्रेरणादायी आढावा घेतला. तसेच आर्किटेक्चर हा अभ्यासक्रम हा उत्कृष्ट व व्यावसायिक अभ्यासक्रम असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रीती तट्टे होत्या. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी सांगितले की, करिअर निवडताना केवळ सामाजिक दबावापेक्षा स्वतःच्या आवडी, क्षमता, व कलांचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. आर्किटेक्चर हे क्षेत्र केवळ कलात्मकतेचा विकास करणारे नसून व्यावसायिक दृष्टिकोनातूनही प्रगतीची अनेक दारे उघडणारे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

फुलोर अॅकॅडमीचे संचालक प्रा. पियुष जोशी यांनी नवीन शैक्षणिक धोरणानुसार (National Education Policy - NEP) आर्किटेक्टचा व्याप्त क्षेत्र केवळ बांधकामापुरता मर्यादित न राहता, डिझाईन, प्लॅनिंग, हेरिटेज कन्झर्वेशन, युर्बन डेव्हलपमेंट व शिक्षण क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात करिअरच्या संधी उपलब्ध होत आहेत, याकडे लक्ष वेधले.

इंजिनिअर राम विघे यांनी द इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअर्स (इंडिया), अमरावती शाखेच्या कार्यपद्धती व त्यांच्या कार्याच्या विविध पैलूंची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, इंस्टिट्यूट विद्यार्थ्यांना व्यावसायिक नोंदणी, प्रशिक्षण व उद्योगांशी जोडण्याची संधी उपलब्ध करून देते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आर्किटेक्ट तृप्ती भामकर यांनी प्रभावीपणे पार पाडले. या प्रसंगी विद्यार्थी, पालक, विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षक व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आर्किटेक्चर विषया संबंधित अधिक माहिती करिता प्रा. सचिन हजारे (मो. ९९७५४५२२३९) यांच्याशी संपर्क साधन्याचे महाविद्यालयाच्या वतीने सांगण्यात आले.

# पोलिस आयुक्तांच्या नावे फेसबुकवर बनावट अकाउंट

## आरोपी निघाला राजस्थानचा : गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या नावाने फेसबुकवर बनावट अकाउंट बनवून काहींना पैसे मागण्यात आल्याची धक्कादायक बाब शुक्रवारी येथे उघड झाली. सायबर पोलिसांनी बनावट अकाउंट बनविणाऱ्या भामट्याची ओळख पटविली असून, तो राजस्थानचा असल्याचे चौकशीत समोर आले आहे. याप्रकरणी सायबर पोलिसांनी आयटी अॅक्टअन्वये गुन्हा दाखल केला आहे.

राजस्थानच्या त्या सायबर भामट्याने सीपींच्या नावाने बनावट अकाउंट बनवून शहरातील काहींना फ्रेंड रिक्वेस्ट पाठविली. तथा चॅटिंग करून काहींना रक्कमदेखील मागितली. त्यातील काहींना सीपींशी संपर्क करून शहानिशा केली असता, हा तोतयेगिरीचा प्रकार उघड झाला. सुत्रानुसार, ३० एप्रिल रोजी शहरातील चार ते पाच व्यक्तींना त्या बनावट अकाउंटवरून फ्रेंड रिक्वेस्ट आल्या, तर काहींना मेसेज आले आहेत. काहींनी प्रत्युत्तरात फाइन सर, असा प्रतिसाद दिल्याने आरोपीने काहींना मोबाइल नंबर मागितले. त्या भामट्याने स्वतःला सीपी नवीनचंद्र रेड्डी असे संबोधत आपल्या सीआरपीएफमधील संतोषकुमार नामक मित्राची बदली झाल्याने त्याला घरातील फ्रीज, टीव्ही, वॉशिंग मशीन विकायची असल्याची बतावणी केली. काहींना शंका आल्याने त्यांनी ती बाब सीपी नवीनचंद्र रेड्डी यांच्या कानावर घातली. सीपींनी तत्काळ सायबर पोलिसांना सुचित केले.



सोशल मीडियावर अधिकाऱ्यांचे बनावट अकाउंट तयार करून त्या माध्यमातून ऑनलाइन फसवणूक केली जाते. तसाच प्रकार दोन दिवसांपूर्वी माझ्या नावाने उघड झाला. आरोपी राजस्थानचा असल्याचे समोर आले आहे.

**नवीनचंद्र रेड्डी,**
**पोलिस आयुक्त.**

# तुंबलेल्या नाल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात : सर्वत्र पसरली दुर्गंधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

स्थानिक झोन क्रमांक ०३ दस्तुर नगर येथील बेनोडा परिसरातील मुंगसाजी मंगल कार्यालयाजवळ असलेला नाला कित्येक महिन्यापासून साफ केला नसल्याने त्यात मोठ्या प्रमाणात घाण व कचरा साचला असून नाला पूर्णपणे तुंबलेला आहे,व या नाल्याचा पाणी प्रवाह सुरळीत होत नसल्याने परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरलेली असून या नाल्याच्या घाण पाण्यात जनावरे व मछ्रांचे प्रमाण वाढले असल्याने रोगराई पसरण्याची दाट शक्यता आहे हा नाला स्वछ करून बंद असलेला पाणी प्रवाह सुरळीत करणेबाबतची तक्रार दिनांक २७/०४/२०२५ रोजी मनपा कडे ऑनलाईन, व्हाट्सएप, तसेच प्रत्यक्षात श्री गोविंदा रेसिडेन्सी मालू लेआऊट कलोती नगर येथील नागरिकांनी केलेली आहे,परंतु आठ दिवस उलटूनही अद्यापपर्यंत कुठलीही कार्यवाही संबंधित विभागाने केलेली नाही परिणामी परिसरातील नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे सदर तुंबलेला नाला त्वरित स्वच्छ करून पाणी प्रवाह सुरळीत करण्याची मागणी परिसरातील गजानन ठवकर,सतीश माहुरे,नितीन देशमुख, संदीप तायडे,महेश खत्री, आकाश बेंद्रकर, हरीश पारवाणी,विलास चौधरी, दिनेश सोनी,कपिल बजाज, रचना झा,अनिल डोंगे,निलेश सचदेव, विलीसेठ सावलानी,मनीष वरदाणी, अरुण सोनवणे, धीरज आसरा,अतुल फुटाणे, संजय मनवर, जे डी डोंगरदिवे,प्रकाश शेळके,सुरज मेश्राम ई. नागरिकांनी केली आहे.

# दारू पिऊ नको, म्हणणाऱ्या कीर्तनकारांना मिळेना मानधन

## कीर्तन पडले बंद : जिल्हाभर दारूविक्री जोरात, जनजागृती करायची कशी?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

दारू आरोग्याला हानीकारक आहे. यापासून कोणताही फायदा मनुष्याला होत नाही. दारूच्या व्यसनामुळे कुटुंबात वादविवादाचे प्रसंग घडतात. अनेक जण कर्जबाजारीदेखील होतात. व्यसनापासून दूर करण्यासाठी समाजकल्याण विभागाने जनजागृतीची धुरा कीर्तनकारांच्या खांद्यावर दिली होती. मात्र, कोरोना काळापासून मानधन मिळत नसल्याने कीर्तन बंदच पडले आहे.

ग्रामीण व शहरी भागात परवानाधारक दुकान व अवैधरीत्या मोठ्या प्रमाणात दारू विक्री केली जाते. या दारूच्या व्यसनात अल्पवयीन मुले, तरुण, वयोवृद्धही अडकत चालले आहे. त्यांना व्यसनापासून अलिप्त करून सुखी जीवनाचा मंत्र कीर्तनकार



आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून देत होते. त्याचा काही प्रमाणात फायदाही होत होता.

दारूमुळे गावगाड्यात भांडण तंटे वाढत आहेत. चोरी, मारहाण अशा व्घटनाही घडत आहे. दारूच्या नशेत खून करण्याच्या घटना घडल्या आहेत. दारू पिणारा नशेत काय करेल, याचा नेम नाही.व्यसनाच्या आहारी गेलेल्या माणसाला घशाखाली रिचविल्याशिवाय चैन पडत नाही. विदेशी न मिळाल्यास देशी काय आणि गावठी काय, काहीही चालते. वर्षाला जिल्ह्यात देशी, विदेशी, बिअर, वाइन, अशी एकूण एक कोटी बल्क लीटरच्या घरात दारू रिचविली जात आहे.

**उपाशी पोटी कशी करणार जनजागृती ?**

कीर्तन करण्यासाठी शासनाकडून कीर्तनकारांना मानधन दिले जात होते. कोरोना काळात या कीर्तनाला खंड पडला. कीर्तनातून प्रबोधन होत असले तरी कीर्तनकारांनाही पोट आहे. उपाशी पोटी ते जनजागृती तरी कशी करणार, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. ग्रामीण भागात मोठ्या कीर्तनकारांना महोत्सवानिमित्त बोलावले जाते. त्यात कीर्तनकार सामाजिक बाबींवर प्रकाश टाकतात. त्यात व्यसन करू नका, असा उपदेशही दिला जातो.

# विद्यापीठाच्या उन्हाळ्यात - २०२५ च्या काही परीक्षांच्या छापात बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**


संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ उन्हाळ्यात-२०२५ च्या लेखी आंत्रची वरची पत्रके विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत, परंतु काही परीक्षांच्या पत्रकात बदल करण्यात आले आहेत. पार्टी पी.जी. डिप्लोमा इन ह्युमन राईट्स एज्युकेशन, बी. फार्म. (सी.बी.एस.एस.) सेमि.-६, बी.फार्म. (सी.बी.एस.एस.) सेमि.-८, बी.आर्च. सेमि.-६ (सी.बी.सी.एस.), एम.बी.ए. सेमि.-३ (सी.जी.एस.) आणि एम.बी.ए. सेमि.-४ (सी.जी.एस.) या परीक्षांचा समावेश आहे.

यामुळसंबंधित लेखकांचे, केंद्राधिकारी, थेटे, परीक्षांना कळ आले असून त्यांना केंद्रे आपल्या विद्याथ्र्यांना कळवण्याची गरज आहे. तरीसुद्धा विद्याथ्र्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिक-यांच्याच नंबरवर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाने कळविले आहे.

# सातबारा उताऱ्यासंदर्भात राज्य सरकारचा मोठा निर्णय, महसूल विभागाचे परिपत्रक जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी राज्य सरकारने सातबारा उताऱ्यासंदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. सातबारा उताऱ्यावरील कालबाह्य आणि निरुपयोगी नोंदी हटवण्यासाठी 'जिवंत ७/१२ मोहीम – टप्पा २' सुरू केली आहे. महसूल विभागाच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला मुंबईतून सुरुवात झाली. सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना कर्ज, जमीन व्यवहार आणि शासकीय योजनांच्या लाभ घेण्यात येणाऱ्या अडथळ्यांपासून मुक्ती मिळणार आहे. अपाक शेरा, तगाई कर्ज, सावकारी कर्ज, नजर गहाण यासारख्या जुन्या नोंदी हटवून सातबारा अद्ययावत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.



याशिवाय, वारस नोंदी, जमिनीचे स्वामित्व आणि सार्वजनिक जागांची नोंद यांना प्राधान्य दिले जाणार आहे. तालुका व मंडळ स्तरावर कॅम्प आयोजित करून ही मोहीम राबवली जाणार असून, जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकाऱ्यांकडे देखरेखीची जबाबदारी असेल. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय शेतकऱ्यांच्या रोजच्या अडचणी दूर करण्यासाठी मैलाचा टप्पा ठरेल, असे म्हटले आहे.

सरकारच्या या मोहिमेमार्फत अपाक शेरा, तगाई कर्ज, बंडींग बोजे, नजर गहाण, सावकारी कर्ज, भूसंपादन निवाडा, बिनशेती आदेश, पोटखराब क्षेत्र, महिला वारस नोंदी यासारख्या कालबाह्य नोंदी हटवून ७/१२ उतारे अद्ययावत करण्यात येणार आहेत. वारसांची नोंद, जमिनीचे स्वामित्व, भोगवट्याचे प्रकार, आणि स्मशानभूमीसारख्या सार्वजनिक जागांची नोंद अधिकार अभिलेखात समाविष्ट केली जाणार आहे.

कालबाह्य नोंदींमुळे शेतकऱ्यांना कर्जप्रकरणे, जमिनीच्या खरेदीविक्री व्यवहारात तसेच शासकीय योजनांच्या लाभात अडचणी येत होत्या. त्यामुळे ही मोहीम शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरणार असून, तलाठ्यांना संबंधित फेरफार नोंदी घेऊन जुने बोजे व शेरे कमी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तालुका आणि मंडळ स्तरावर कॅम्प घेऊन ही कार्यवाही करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकारी यांच्यावर देखरेख व अहवाल सादरीकरणाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

# चंद्रपूरचे जिल्हाधिकारी ठरले राज्यात सर्वोत्कृष्ट शंभर दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहीम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३चंद्रपूर**

राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. हे राज्यातून सर्वोत्कृष्ट ठरले आहेत. जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या नेतृत्वात ८४.२९ गुण मिळवत चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राज्यातील शासकीय कार्यालयांना शिस्त लावणे, नागरिकांची कामे जलदगतीने पूर्ण होणे आणि शासन–प्रशासन व नागरिकांमधील विश्वास वृद्धिंगत होणे या उद्देशाने १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहीम हाती घेण्यात आली होती. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्याचे मूल्यमापन महाराष्ट्र दिनी जाहीर करण्यात आले. यात उत्कृष्ट जिल्हाधिकारी कार्यालय श्रेणीत चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाने बाजी मारली. तर द्वितीय क्रमांक जिल्हधिकारी कार्यालय, कोल्हापूर (गुण ८१.१४), तृतीय जिल्हाधिकारी जळगाव (८०.८६), चतुर्थ जिल्हाधिकारी अकोला (७८.८६) आणि पाचवा क्रमांक जिल्हाधिकारी नांदेड (६६.८६ गुण) यांनी पटकावला.याबाबत बोलतांना जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाला राज्यात प्रथम क्रमांक मिळाला, ही आपल्या सर्वांसाठी अतिशय अभिमानाची बाब आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे यात मोठे योगदान आहे. लोकांना अधिकाधिक चांगल्या सेवा कशा देता येईल, शासन त्यांच्यापर्यंत कसे पोहचले, याबाबत योग्य नियोजन करण्यात आले. तसेच शासनाच्या सुचनेप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील संकेतस्थळाचे अद्ययावतीकरण, तक्रार निवारण, अभ्यागतांसाठी सोयीसुविधा, ई–ऑफिस प्रणालीचा वापर, कृत्रीम बुद्धिमत्तेचा वापर करून अधिकार व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, गुंतवणुकीस प्रोत्साह आणि नाविन्यपूर्ण उपक्रमाचा यात समावेश होता, असे जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी सांगितले.

### मूल्यांकन पध्दत

भारतीय गुणवत्ता परिषद मार्फत संकेतस्थळ अद्यावतीकरण व कार्यक्षमता, कार्यालयीन सोयीसुविधा, तक्रार निवारण व्यवस्था, गुंतवणूक अनुकूलता, नागरिकांसाठी सेवा सुलभता, तंत्रज्ञान वापर अशा दहा निकषांवर आधारित मूल्यमापन करण्यात आले आहे.

# पाणी बॉटल, कोल्ड ड्रिंक्स थंड करण्याचे दुकानदार पैसे मागत असेल तर तक्रार कुठे कराल?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

उन्हाळा सुरू झाला की, अनेकजण थंड पेय घेतात. मात्र, काही ठिकाणी 'कुलिंग चार्जेस'च्या नावाखाली अतिरिक्त पैसे घेतले जातात. प्रत्यक्षात एमआरपीत कुलिंग चार्जेसचा समावेश असतो. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात कुलिंगचे अतिरिक्त चार्जेस आकारल्याचे सहसा पाहायला मिळाले नाही. परंतु कुलिंग चार्जेसच्या नावाखाली अधिकच्या पैशांची मागणी कोणी करत असेल, तर त्यांच्याविरुद्ध थेट ग्राहक मंचात तक्रार करता येऊ शकते. पण अनेकजण याकडे कानाडोळा करताना दिसून येतात.तप्त उन्हाच्या झळापासून बचाव करण्यासाठी थंडपेयाची मागी वाढल्याने सर्वत्र दुकाने सजलेली दिसून येतात.सध्याच्या उन्हाच्या वाढत्या तापमानात थंड पाण्याची बॉटल, कोल्ड्रिंक्सला मागणी वाढली आहे. कोल्ड्रिक्स थंड विकणे ही दुकानदारांची जबाबदारी आहे. ते कोल्ड्रिक्स थंड करण्याचे अतिरिक्त पैसे घेऊ शकत नाहीत.

**दुकानदार जास्त पैसे मागाल तर काय कराल?**

कोणत्याही कंपनीकडून थंड पेय तयार करताना कुलिंग चार्जेस एमआरपीमध्ये समाविष्ट केले जातात. त्यामुळे ग्राहकांना अतिरिक्त शुल्क देण्याची गरज नसते. मात्र, ग्राहकांच्या अज्ञानाचा फायदा घेत काही दुकानदार अतिरिक्त पैसे मागतात. कुलिंग चार्जेसच्या नावाखाली जास्त पैसे घेतले गेल्यास नागरिकांना ग्राहक मंचाकडे तक्रार नोंदविता येते.

# शहरी व ग्रामीण भागात व्यायामशाळा निर्माण करण्यासाठी अनुदानात दुपटीने वाढ

## आवश्यक सोयीसुविधा, दर्जेदार साहित्य मिळण्यास होणार मदत

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

राज्यासह अमरावती जिल्ह्यात गुणवत्तापूर्ण व उत्कृष्ट खेळाडू निर्माण व्हावेत, यासाठी राज्य शासनाचे क्रीडा धोरण अमलात आणले आहे. शहरी व ग्रामीण भागात व्यायामशाळा निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. आता व्यायामशाळेच्या अनुदानात दुपटीने वाढ करण्यात आलेली आहे. यापूर्वी सात लाख रुपयांचे अनुदान देण्यात येत होते. आता १४ लाख रुपये अनुदान दिले जाणार आहे.

राज्यात २०१२ मध्ये क्रीडा धोरण अमलात आले. यापूर्वी व्यायाम शाळेसाठी दोन लाख रुपयांचे अनुदान दिले जात होते. हे अनुदान तोकडे असल्याच्या तक्रारी, विनंती शासनाकडे प्राप्त झाल्या. त्यानंतर २०१९ मध्ये शासनाने यात वाढ करून अनुदानाची रक्कम सात लाख रुपये केली होती. त्यानंतरही व्यायामशाळेत विविध साहित्यांची वाढती मागणी व दरामध्ये वाढ झाल्याने हे अनुदान कमी पडत होते. अनुदानात वाढ करण्याची मागणी सातत्याने करण्यात येत होती. याची दखल घेऊन राज्य सरकारने अनुदानाची रक्कम सात लाख रुपयांवरून १४ लाख रुपये केली. यासंदर्भातील आदेश २३ एप्रिल २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला.



**उत्कृष्ट खेळाडू निर्मितीसाठी व्यायामशाळा आवश्यक आहेत**

आता तर शासनाने व्यायाम शाळेसाठी १४ लाख रुपयांपर्यंत अनुदान वाढविले आहे. व्यायामशाळा मंजुरीसाठी इच्छुकांनी विहीत नमुन्यात प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाला सादर करावे.

**गणेश जाधव**
**(जिल्हा क्रीडा अधिकारी,अमरावती)**

**अर्ज कोठे व कसा करायचा?**

व्यायामशाळा उभारणीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडे अर्ज सादर करावा लागतो. तो अर्ज थेट जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय किंवा शक्य नसल्यास तालुका क्रीडा अधिकारी कार्यालयातही सादर करता येतो.

**निकष काय?**

व्यायामशाळा उभारणीसाठी योग्य व आवश्यक प्रमाणात जागा असावी. अंदाजपत्रक तयार करून ते सादर करावे लागते. व्यायामशाळा योग्यप्रकारे चालविण्याबाबतचे हमीपत्र आवश्यक आहे.

# सेतूमधील प्रमाणपत्रांना लागणार दुप्पट शुल्क : घरपोच सेवेच्या नावाखाली नागरिकांची लुबाडणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

राज्य शासनाने ऑनलाइन प्रमाणपत्राच्या शुल्कात वाढ केल्याने सर्वसामान्य नागरिकांना आता सेतू सुविधा केंद्रातून ऑनलाइन प्रमाणपत्र काढताना अधिक रक्कम मोजावी लागणार आहे. घरपोच सेवा देण्याच्या नावाखाली ही दरवाढ केली असली तरी प्रत्यक्षात सेतू किंवा आपले सरकार केंद्रावर गेल्यानंतरच लागणारे प्रमाणपत्र हे नागरिकांना मिळणार आहेत.





२७ मार्चच्या शासन निर्णयानुसारआपले सरकार सेवा केंद्राची संख्या दुप्पट करणे, तसेच सेवा केंद्रातून देण्यात येणाऱ्या सेवांच्या घरपोच दरात सुधारणा करणे व घरपोच सेवेबाबत निर्णय घेतला आहे.या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली असून आपले सरकार सेवा केंद्रातून (सेतू) मिळणाऱ्या विविध दाखल्यासाठी आता दुप्पट ते सव्वा दोन पट दर द्यावा लागत आहे. पूर्वी दाखल्यासाठी शासनाला सेवाशुल्क म्हणून ३३ रुपये ६० पैसे द्यावे लागत होते, हेच सेवाशुल्क आता ६९ रुपये द्यावे लागेल. नव्या शासन निर्णयानुसार प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये दोन आपले सेवा केंद्र स्थापन केले जाणार आहेत.

कुठे गेली घरपोच व्यवस्थाआपले सरकार पोर्टलवरून नागरिका घरपोच सेवा मिळावी, यासाठी ही दरब करण्यात येत असल्याचे माहिती तंत्रज्ञानमंत्री आशिष शेलार यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सांगितले होते. पण प्रत्यक्षात कुठेही नागरिकांन घरपोच सेवा मिळेल अशी व्यवस्था वणीत कुठेच नाही. नागरिकांना प्रत्यक्ष सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार केंद्राव जाऊनच प्रमाणपत्र घ्यावे लागत आहेत.


**महा ई–सेवा केंद्रातून या दाखल्यांसाठी दुप्पट दर**

महा ई–सेवा केंद्रातून मिळणाऱ्या ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र, वंशावळीचे प्रमाणपत्र, अल्प भूधारक शेतकरी असल्याचे प्रतिज्ञापत्र, पत दाखला, जन्माबाबत दाखला, मिळकतीचे प्रमाणपत्र, वय, अधिवास आणि राष्ट्रीय प्रमाणपत्र, वारसा प्रमाणपत्र, गौणखनिज परवाना, सांस्कृतिक कार्यक्रम परवाना, रहिवासी प्रमाणपत्र, स्टोन क्रेशर परवाना, मृत्यूबाबत दाखला, सर्वसाधारण प्रतिज्ञापत्र, जातीचा दाखला, नॉन क्रिमिलेअर दाखला, भूमिहीन शेतकरी दाखला, शिधापत्रिकासंबंधी सर्व कामे या विविध दाखल्यांसाठी आता दुपटीपेक्षा अधिक दर द्यावा लागणार आहे.

# माणसांच्या बाजारातही रोजगारावर झालाय परिणाम : गमजुरांचा ठिय्या वरून अनेकांना परतावे लागते रिकाम्या हाताने

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

दोन वेळच्या जेवणाची भ्रांत शोधात गावातील मुख्य बाजार पेठेतील जागा पकडत कुटुंब कबिल्यासह उभं राहायचं. काम मिळालं तर ठीक नाही तर काम मिळेपर्यंत तिथेच थांबायचं. कारण या ठिकाणाहून मिळणाऱ्या रोजीरोटीवरच पावसाळ्यातील घरचे गणित अवलंबून. कामाची शाश्वती नसली तरी



१०० हून अधिक मजूर बाजारात रोज नव्या उमेदीने उभे राहतात. शहरातील अनेक भागांतील कामगार कमान चौकात मजूर सकाळपासून येऊन कामाच्या प्रतीक्षेत बसलेले असतात. मात्र हाताला काम मिळेलच याची शाश्वती नसते. अनेकदा रिकाम्या हातानेच घरी परतावे लागते. सध्या गावाकडे काम नसल्याने कामाच्या शोधात कामगार व मजूर शहरात येतात. परंतु हाताला रोजगार न मिळाल्याने उपाशी राहण्याची वेळ काही कुटुंबावर ओढवते. सध्या शेतीची कामे संपली आहे. त्यामुळे त्याचा परिणाम रोजगारावर झाला आहे. १ परिणामी ग्रामीण भागातील मजूर कामाच्या शोधात दररोज वणीत येत असल्याचे चित्र आहे.

### शहरात मजुरीचे दर काय?

मिस्त्री : ६०० ते ७०० रूपये
मिस्त्रीच्या हाताखाली : ५०० ते ५५०
सिमेंट मटेरियल कालवणे : ४०० ते ५००
नियमित काम : ५०० रूपये.

# वन विभागाच्या सुकलेल्या रोपांना लंगोटच्या टँकरचा पाणी : गोंडवाघोली जंगलात वृक्ष लागवडीच्या नावावर झाला भ्रष्टाचार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३परतवाडा**

प्रादेशिक वन अधिकारी परतवाडा यांच्या हद्दीमधील मौजा गोंडवाघोली अंतर्गत येणाऱ्या शहानुर धरणाच्या पायाशी असलेल्या १५ हेक्टर जमिनीवर सन २०२४ मध्ये पावसाळ्यात १६ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली होती प्रादेशिक वन अधिकाऱ्याच्या दुर्लक्ष ते मुळे चक्क १६ हजार वृक्ष मृत्युमुखी पडली , संबंधित लोकेशनवर एकही झाड जिवंत नसल्यामुळे वन अधिकाऱ्याला



चांगलीच घाबर सुटली , दुसरीकडे वृक्ष लागवडीकरिता खड्डा खांदण्याकरिता हुकूमशाही चालवत ठेकेदाराने चक्क मध्य प्रदेश वरून मजूर वर्ग बोलविले ज्याचा विरोध स्थानिक पातळीवर रोजगार मिळण्याकरिता गावकऱ्यांनी चांगलाच केला होता , वृक्ष लागवडी करिता गावकऱ्यांना मजुरीवर बोलविण्यात आले त्यांच्या घामाचे पैसे आज पर्यंत त्यांना मिळाली नाही अशी चर्चा आता रंगू लागली आहे , मृत्युमुखी पडलेल्या वृक्षांच्या खड्ड्यात देखावा म्हणून एप्रिल महिन्यात पुन्हा ५ हजार झाडांची वृक्ष लागवड करण्यात आली , आगी सारख्या तापमानात वृक्षांना पाणी देण्याचा ढोंग लंगोटचा टँकर दोन मजुरांना घेऊन लोकेशनवर करण्याचा चित्र पहायला आता मिळत आहे , ठेकेदार , रोजगार सेवक , वनरक्षक , वनपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी वृक्ष लागवडीच्या नावाखाली कोटी रुपयांची अफरातफर केल्याची चर्चा गावकऱ्यांमध्ये रंगली आहे उपवन संरक्षक प्रादेशिक अमरावती , सहाय्यक वन संरक्षक अमरावती मृत्युमुखी पडलेल्या वृक्ष लागवडीची चौकशी करून अहवाल प्रमाणे साखळी बनवणाऱ्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का असा प्रश्न वाघडोह व गोंडवाघोली येथील नागरिकांना पडला आहे.